नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

साहित्य संघाचे मुखपत्र

मूल्य १ रुपया

युगवाणी

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
ग्रंथ संग्रह

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

या अंकात

१. सूक्तिधन : लो. बाळ गंगाधर टिळक

२. कविता : श्री. गं. कावळे, दत्तु गोरे,
ज्ञानेश्वर शंभरकर, मनोहर वझे,
अविनाश वरोकर, श्रीरंग विष्णु जोशी,
विठ्ठल भिकाजी वाघ.

३. द्वंद्व : या. वा. वडस्कर

४. राजगुरू संत सेना : श्री. वि. गुजर

५. काही क्षण : बाळकृष्ण बन्नोरे

६. स्वभाव-वैशिष्टय : र. द. सरंजामे

७. भाषा जुनी पण गाऱ्हाणे नेहमीचे :
पारसनीस

८. पुस्तक-परीक्षणे :
१ मनोगते : मा. नी. ग.
२ वाहिलेली फुले :
३ नाटक झाले जन्माचे :
वसंत वऱ्हाडपांडे

९. नरबली : आयर चॅटरटन

याशिवाय संघवार्ता, वि. सा. संघाचे
१९६५-६६ चे कार्यवृत्त

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ-पुरस्कृत
विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

संपादक :
मा. नी. गलगलीकर

संपादक मंडळ

श्री. बाळासाहेब ढवळे — श्री. वसंत वऱ्हाडपांडे
सा. भू. तु. ना. काटकर — श्री. श्रीकान्त राय
श्री. व्यं. नी. पंडित — प्रा. पुंडरीक धुमाळे

वर्ष २१] आगस्ट १९६६ [अंक ४

सूक्ति-धन

आपला हिंदुस्थान देश ज्ञानाचे, वैभवाचे, यशाचे आणि पूर्ण स्वराज्याचे सुख अनुभवीत आहे अशी जेव्हा त्याची चोहोकडे ख्याती झाली होती, तेव्हा एक सर्वज्ञ, महापराक्रमी, यशस्वी व परमपूज्य क्षत्रियाने दुसऱ्या महान् धनुर्धरास क्षात्रधर्माच्या स्वकार्यास प्रवृत्त करण्यासाठी गीता उपदेशिली आहे, हे वाचकाने प्रथम लक्षात ठेविले पाहिजे. जैन व बौद्ध धर्मांचे प्रवर्तक महावीर व गौतमबुद्ध हे दोघेही क्षत्रियच होते. तथापि दोघांनीही वैदिक धर्मातील फक्त संन्यास मार्गाचाच अंगीकार करून क्षत्रियादिक सर्व वर्णास ज्याप्रमाणे संन्यास धर्माचा दरवाजा मोकळा करून दिला, तशी श्रीकृष्णाची गोष्ट नसून क्षत्रियादिकांनीच काय पण ब्राह्मणांनीही निवृत्ती मार्गातील शांती-बरोबर निष्काम बुद्धीने सर्व कर्मे आमरणान्त करण्याचा मार्ग स्वीकारला पाहिजे, असा भागवत धर्माचा उपदेश आहे. परंतु कोणताही उपदेश झाला तरी तो करण्यास काहीं तरी कारण घडून यावे लागते आणि तो उपदेश सफल होण्यास शिष्याच्या मनात सदर उपदेशाचे ज्ञान करून घेण्याची इच्छाही प्रथम जागृत झालेली असावी लागते. म्हणून या दोन्ही गोष्टींचा खुलासा करण्यासाठी गीतेच्या पहिल्या अध्यायात श्रीकृष्णांनी अर्जुनास हा उपदेश करण्याचे काय कारण झाले, ते व्यासांनी सविस्तर वर्णिले आहे.

लो. बाळ गंगाधर टिळक
'गीतारहस्य'

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कविता—

त्याच भेगा....तीच धडपड...तेच दुःख

किल्येक युगापासून
लढत वेत आहेत लाटा
किनाऱ्याला धडक देत
मनातला आशय सांगत
तसूभरही हटला नाही किनारा मागे—
आल्या नाहीत शिंपा
मोती घेऊन वर......

ढवळला गेला जरी खालून वर
आकाशाचा भर्जरी वरबार बघून
बेजार झालेले मेघ
अनेकदा छावणी घालतात
वेढून आकाश
पण निष्फळ
पुन्हा विराजमान होतात नक्षत्रे
त्याच थाटात
त्याच दिमाखात .

अक्षरे कोरल्या गेलीत
युगाच्या लेणीवर
खोदले गेले महान संदेश
वारा लय जुळवून
गात आहे सप्तसुरावर
फिरतो आहे अखंड
त्रिभुवनास प्रदक्षिणा घालीत
तरी धरतीचे काळीज फडफडते आहे
त्याच भेगा.......तेच दुःख
तीच धडपड.........

—श्रीपाद गंगाधर कावळे

अर्थामधुनी—

अर्थामधुनी अर्थ धावतो
शब्दोशब्दी थिजती चर्चा.
तशात त्यातुन अनर्थ स्रवता;
उच्चारी मग बसती वाचा !

बसती वाचा—स्वरही जिरती
उगाच संशय कुठे मनातुन.
दिक्कालाच्या अनंत वृष्टी;
कळे कसे ते गर्भित त्यातुन !

अर्थामधुनी अर्थ धावतो
शब्द—स्वराची अडगळ सोडुन.
टीकाकर्ता—विचारवंतही—
सार शोधितो शोधुन—खोदुन !

अर्थामधुनी अर्थ चालला
कालयुगाची धरुनी संगत.
इथे मराठीचियेच नगरी;
प्रबंध करितो गर्दि अशाश्वत !

—दत्तु गोर

एक अभंग

लाऊन डोहाळे	निळ्या निळाईचे	
क्षण अभंगाचे	ओलावती,	१.
ओलसर माथा	अनंत फुलांचा	
निगूढ गंधाचा	भोळा जीव.	२.
आभाळ स्पर्शून	आले वरी रान	
उचंबळे मन	अवघेची	३.

—ज्ञानेश्वर शंभरकर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

हृदयाच्या पर्वतांवर उघड

हृदयाच्या पर्वतांवर उघड–
पहा. शब्दांचे अखेरचे खेडे,
आणि अधिक वर
(तरीपण किती सुक्ष्म !)
अजून एक अवशेषरूप
भावनांचे वावर. दिसते तुला ?
हृदयाच्या पर्वतांवर उघड—
वैरागी खडक,
तळव्याखाली.
तरीपण इथेसुद्धा
काही तरी उमलते, मुक्या कड्यातून.
उमलते गात वातावरणात
रोपटे एक अजाण.
जिथे एकचित्त होऊन
अनेक पर्वतश्वापदे आश्वासित जातात.
तिथे थबकतात.
व बलाढ्य पक्षी एक आसरा मिळालेला
घालतो घिरट्या
शिखरांच्या निखळ नकाराभोवती.
पण, हाय !
तो नाही आता सुरक्षित.
इथे हृदयाच्या पर्वतांवर.

(रैनर मारिया रिल्के)
— अनुवादक : मनोहर वझे

१–व्यथा

डोळ्यांत घुकं...
एक मूक आत्मनिवेदन
नियतीनं कपाळी लिहिलेलं...
कल्पांतापर्यंत न मिटणारं
मनाला मानवत नसताही
(‘अडला नारायण’च्या स्वरूपात घडणारं)
आसवांचं अतिरिक्त अभिवादन... !
चारचौघांची निष्ठा अन् प्रतिष्ठा
बनलेला संपत्तीचा केरकचरा...
रयतेनं मानवतेला दिलेलं ऋण...
एक वादळ...
सामान्यांचा समज—एक गुण...सगुण...
पण तिच्यात हीच एक उणीव...
दुसरं नाव दुर्गुण...
रूप...स्वरूप...गोर...नितळ...
तन मन निरागस निर्मळ...
पंचविशीत रेंगाळणाऱ्यांची निष्ठा
एक वरदान... !
वय तिचं सोळा...
एक केवळ पालापाचोळा...
आवर्त अन् प्रत्यावर्तात तरंगणारा...
ज्याला नाही उत्थान अन् उःशाप
असा एक शाप... !
(तिची अनुभूतीत ओलावलेली जाणीव...)
चार दोन ललचावणाऱ्या नजरांचं...
एक लक्षवेधी भांडवल...
तिची रेखीव गोरकाया...विधात्याची किमया...
तुटलेल्या पतंगाची अव्यक्त व्यथा
(एक उपेक्षेचा विषय)
प्रजेच्या पुत्रांना...अर्थपूर्ण आशय...
पण...
तिच्यासाठी ती...एक आशयशून्य आवर्त... !

—अविनाश वरोकर

उडून गेले दूर पाखरू

उडून गेले दूर पाखरू
सुन्न रिकामा पडला पंजर
घडी करा हातापायांची
भागेलहि मग सहा मणावर
विवस असे हे भावबाढिचे
कुठून आणशिल तेल डबाभर ?
दोन पिंट पुरवून शिपडा
जसा डालडा भात मुदीवर !
सूर्याचा फुटताना गोंडा
उडेल कवटी...फुटेल अंबर
रेशनिंगच्या बारी मधला
गळून पडतो असाच नंबर !

श्रीरंग विष्णू जोशी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पाच कविता

: १ :

माझा मराठीचा जीव
नाचे होऊन लावणी
देइ डफावर थाप
बोले शाहिराची वाणी

घाम बाळून लावितो बुका काळीचा कपाळी
तमाशात रंगणारा गातो पहाटे भूपाळी—

मस्तानीच्या सोबतीत बाजी होऊन रंगतो
दुश्मनाच्या सुनेलाहि आई म्हणून वंदितो

चोखया होऊन राहे
विठ्ठलाच्या पायरीशी
विटेवरी उभा ठेवी
माझा पुण्डलिक त्याशी.

: २ :

आला सुवास कोठून आज तुझ्या यौवनाला
हे गुलाबी रूप आले कोठून तुझ्या पाहुण्याला—

सांग तुझ्या पाकळ्यात भरली कैसं शिशिरी
गे कोठला उनाड वारा तया स्पर्शून गेला—

कशा उमलत्या लाजल्या नयनांच्या पाकळ्या
तू कोणत्या किरणांचा लाविला ओठास प्याला—

सांग कैसे फुलारले हे काव्य तुझ्या रोमरोमी
कुण्या खंय्यामच्या कल्पनेचा रंग तया लागला—

सांग तू प्राशिलास चंद्र कोणत्या पौर्णिमेचा
कैसा उधाणला तुझ्या सागर गात्रागात्रांतला

सांग तुझ्या केसात असे रात्र कुठे पेंगली
कुणा खुणवितेस त्यात माळावया चांदण्याला—

: ३ :

कोडी उकलता जगाची मीच त्यांत गुंतलो
व्यथा अवलोकिता मी कथा होऊनी ठेलो—

शिउले आभाळ देउनी हृदयाची ठिगळे
आतड्यांचा अर्पून धागा माझा मीच उसवलो—

तृषा शमवू कुणाकुणाची एकटा मी वर्षुनी
अता तरी रे मजला सोडा मृगजल होऊनी गेली—

उजाडण्या दशदिशात मी पेटवूनी घेतले
दिवसाच्या टाचेखाली रात होऊन पडलो —

ढेकरास्तव तुमच्या दिला आयुष्याचा घास मी
अता पेटतो घरोघरी मी भूक होऊनी गेलो—

: ४ :

ऋणी जाहलो जन्माचा मी
आयुष्य बांधुनी पाठीशी
फेड करुनी टाकीन आता
अर्पुन सारे मरणाशी—

: ५ :

प्रश्नचिन्हे चिणून आता
शोध घेतो उत्तरांचा
घडवाया मूर्ति उद्याची
घाम पितो फत्तरांचा
घाम पिता फत्तरांचा
भवितव्याची वाहे गंगा
लोंढ्यामाजी वाहून पाहू
अडविणारा काळ लफंगा
अडविणारा काळ लफंगा
ऋचा वाचतो साक्ष्याची
करा तयाचे पारायण वा
म्हणा आरती जिण्याची
म्हणा आरती जिण्याची पण
पुन्हा कधी रे जन्मू नका
उगवणारा सूर्य पाहण्या
डोळे बंद ठेवू नका—

—विठ्ठल भिकाजी वाघ

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

द्वंद्व

या. वा. वडस्कर

[" द्वंद्व " ही एकांकी–कथा आहे. ह्याचा अर्थ असा की, नाट्यानुकूल तंत्राने लिहिलेल्या या कथेतील निवेदनात्मक भाग दिग्दर्शनाच्या सूचना समजून उरलेले संवाद म्हणजे एकांकी प्रयोग करताना कथेतील 'मी' ला 'मी' व निवेदक अशी दुहेरी भूमिका करावी लागेल. अशा प्रकारचा प्रयोग जॉन स्टाईन बेक ह्याने आपल्या एका कादंबरीत केला आहे. कादंबरीचे उपशीर्षक आहे A Novel in Three Acts.

—लेखक]

टक्‌टक्

अपेक्षित होतीच. कारण तशी व्यवस्था मीच करून ठेवली होती. विजयाचे स्मित दडवीत, सावकाश जाऊन दार उघडले. दारात विजया साने उभी होती. सहज आत्मविश्वास, कदाचित्, काहीशा अद्धटपणाचे प्रसाधन चोपडलेला तिचा चेहरा हसत होता.

हे मात्र काहीसे अनपेक्षित होते.

आकर्षक चेहरा आणि आक्रमक शरीराची, नेहमीच तोऱ्यात वावरणारी ही मुलगी इतक्या सहज जाळ्यात येईल अशी अपेक्षा मीही केली नव्हती. (पण ती खरोखरच जाळ्यात आली होती का ?)

" सर, तुम्ही अगदी शिष्ठ आहात." आत येत ती म्हणाली. चेहऱ्यावर उठून दिसावा इतका लटका रुसवा.

एकूण आजचा दिवस आश्चर्यांनी भरलेलाच म्हटला पाहिजे !

" अभिनंदन, " तोंडभर हसत आणि हात पुढे करीत मी म्हणालो.

क्षणभर तिच्या डोळ्यात वासनेची ज्वाला जीभ बाहेर काढीत असल्याचा भास झाला. तिचे सारे शरीर गंधमय होऊन उठले. पण क्षणभरच. माझ्या हाताकडे दुर्लक्ष करीत निर्विकारपणे तिने विचारले :

" कशाबद्दल ?"

" तुझ्या धीटपणाबद्दल. "

" धीटपणा ? " आवाजात बेफिकिरी.

" मला सरळ तोंडावर शिष्ठ म्हणालीस. " " दुसऱ्यांच्या सद्‌गुणांबद्दल बोलताना सामान्यत: फार अवघडून बोलतात लोक. म्हणून तुझ्याबद्दल कौतुक. "

" सद्‌गुणांबद्दल ? " उपरोध लपविण्याचा अजिबात प्रयत्न न करता ती म्हणाली. " शिष्टपणा हा सद्‌गुण वाटतो तुम्हाला ? "

" अर्थातच ! "

" आणि त्याबद्दल अभिमान पण वाटत असेल, नाही ? "

" अहंकार हा तर माझा प्रमुख गुण आहे. प्रयत्नपूर्वक जोपासना करतो मी त्याची. "

" आणि त्याचाही अभिमान. छान ! "

" तो स्थायीभाव आहे माझा. पण, ते असू दे. प्रथम तुझ्या कामाबद्दल बोलू या. आलीस कशी काय ? "

" स्कॉलरशिपचा फॉर्म घेऊन आलेय्, तुमची रेकमेंडेशन हवी होती." (सगळ्याजणी असंच काही-तरी काम काढतात ! ही: ही:)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

"तुला कशाला हवी रेकमेंडेशन ? सहज मिळेल तुला स्कॉलरशिप." माझी स्वारी अर्थात खुषीत होती. माझी खुषी पाहून विजूला गंमत वाटली असावी. एरवी, उत्तर द्यायला ती विलंब लावती ना.

"माझ्यासाठी नाही आलेय् मी." माझ्याकडे रोखून पाहात ती म्हणाली. माझ्यावरील प्रतिक्रिया निरखून पाहण्याचा तिचा उद्देश स्पष्टच होता. (मला ती कच्च्या गुरूचा चेला समजली काय ?)

"सोशल सर्व्हीस ? " "कुणाचा फॉर्म घेऊन आली ? " आवाजात सहजतेचा, भाबडेपणाचा आव आणावयास मी विसरलो नव्हतो.

उत्तर देण्याची घाई न करता, मुद्दामच एक एक शब्द स्पष्ट उच्चारीत, माझ्यावरची नजर जराही ढळू न देता, सरळ रोखून पाहात ती उत्तरली:

"डिसोझाचा." "जॉन डिसोझा. माझा मित्र." आवाजातले आणि नजरेतले आव्हान दंड थोपटीत होते.

सामना, एकूण, अव्वल दर्जाचा होता तर !

चेहऱ्यावर प्रसन्नतेचे हास्य फुलवीत मी उत्तरलो.

"फार चांगला मुलगा आहे डिसोझा." (ठीक है देख लेंगे बेटा।)

निराशा लपवीत असताना तिला चांगलेच कष्ट पडले असावेत.

"आश्चर्य वाटलं ? "

"कशाबद्दल ?"

"एका विद्यार्थ्यांत मी एवढा इंटरेस्ट घ्यावा..."

"फार हुशार आणि सालस मुलगा आहे तो."

एव्हाना ती पूर्णपणे सावरली होती. नवीन फेरीकरिता तयारी करीत असावी. हसतच तिने नवीन डाव टाकला,

"माझे सर्वच मित्र हुशार आहेत."

आणि का कुणास ठाऊक, पण, मला एकदम हसू फुटले. खळखळून. खडक फोडून वर धाव घेणाऱ्या जलस्रोताप्रमाणे. शक्तीचे हे नागवे आणि उद्दाम प्रदर्शन बरे नव्हे हे समजत असताना देखील.

आणि काय आश्चर्य !

माझ्या या हसण्यामुळे विजूच्या देखण्या चेहऱ्यावरचे आत्मविश्वासाचे, उद्धटपणाचे प्रसाधन काही काळ पार उस्कटून गेले. चोरी करताना पकडले जावे असा तिचा चेहरा शरमेने काळा ठिक्कर पडला. ठिकठिकाणी रंग उडालेल्या नखरेल बाहुलीप्रमाणे ती कळाहीन दिसू लागली. महान अभिनेत्रीचे सोंग आणणाऱ्या स्त्रीला चारचौघात 'तू लोकांचे कपडे धुवून जगणारी परटीण आहेस' असे सांगावे, तिची आभूषणे ओरबाडून काढावीत, धुण्याचा ढीग तिच्या पाठीवर बांधून तिची धिंड काढावी, असे तिचे झाले.

आणि मग मलाच तिची कीव वाटू लागली. या चमत्कारिक प्रसंगातून सुटका करून घेण्यास तिला अवसर मिळावा म्हणून मुद्दाम मी रेडिओकडे गेलो. काहीसे आश्चर्य करीतच. विजूच्या तोऱ्याची मान अशी एकाएकी मोडून का पडावी ? यापूर्वी कधी असे घडले नव्हते.

पण ते खरे नव्हते.

आठवणीचा कोंबडा कुठूनसा आरवला. त्याने साद घातली. मनातला अंधार फोडून प्रकाशाचे तट्टू उधळले ते थेट वर्गात.

वर्ग नवीन होता. तास पहिलाच.

वर्गावर नजर टाकली. पण वर्गाची नजर माझ्यावर नव्हती.

हे जरा वेगळे होते. कारण लक्षात यायला वेळ लागला नाही. मुलींच्या अगदी शेवटच्या बाकावर विजू विराजमान झाली होती. दरबारात आसनस्थ झालेल्या महाराणीच्या थाटात. अख्खा वर्ग आपल्याला नजरांची खंडणी देत आहे, ह्याची पूर्ण जाणीव ठेवून. माझ्या आगमनाची फारशी दखल न घेत.

माझे डोळे तिच्यावर क्षण, दोन क्षण अधिक वेळ स्थिरावले असावेत. वर्गाच्या नजरा आता तिच्यावर आणि माझ्यावर आलटून पालटून फिरत होत्या. या नवीन पोरीच्या सौंदर्यात हा तरुण प्राध्यापक कसा विरघळतो हे त्यांना पाहावयाचे होते.

मी मुलांना चार, दोन मामुली प्रश्न विचारलेत. आणि मग मोहरा तिच्याकडे वळवला, तिचे नाव विचारताच वर्गात हास्याची खसखस पिकली. नजरांची देवाण–घेवाण झाली. विजू मात्र चांगलीच तोऱ्यात होती. त्या तोऱ्यातच तिने आपल्याला मॅट्रिकला पहिला वर्ग आणि अनेक विषयात प्राविण्य मिळाल्याचे सांगितले.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

हंसत आणि कौतुक केल्याचा भाव आणीत मी तिला काही प्रश्न विचारलेत. सोपे. माझ्या प्रत्येक प्रश्नाला विजू नाक उडवून ताड्ताड् उत्तरे देत होती.

काही वेळ तिला असे खेळविल्यानंतर मी माझे खास अस्त्र बाहेर काढले. तिला एका पाठोपाठ एक कठीण प्रश्न विचारलेत. पेचात आणणारे. कितीही हुशार विद्यार्थ्याला उत्तरे देता येऊ नयेत असे. प्रश्नांमागून प्रश्न सुटत होते. विजूची बंदूक मात्र रिकामी होती. आत्मविश्वास आणि उद्धटपणा ह्यांचा मुखवटा गळून पडला होता. तिचा ओकावोका चेहरा पाहवत नव्हता.

मी प्रश्न बंद केलेत आणि वर्गात हास्याची एकच लाट उसळली. विद्यार्थी खूप होते. या 'कागदी राणीचा' फज्जा इतक्या सहज उडालेला पाहून आपला आनंद त्यांनी टाळ्या व बाके वाजवून व्यक्त केला होता.

तेव्हापासून विजू माझ्याशी वागताना प्रयत्नपूर्वक उद्यामपणा दाखवीत होती.

विजूने पुन्हा एकदा स्वतःला सावरले. तिचा चेहरा परत एकदा शांत व निर्विकार होता. आत्मविश्वासाचे पाणी डोळ्यात नाचत होते. मी तिचे मनोमन कौतुक करीत असतानाच तिने विचारले:

"मला अनेक मित्र आहेत हे ऐकून तुम्हाला काय वाटते ?" हल्ला सरळ होता.

"मला काही वाटावं म्हणून तू मित्र जोडलेय्स ?" उत्तर तरी सरळच का असू नये ?

"तुम्ही स्वतःला फार महत्व देताहात असं नाही वाटत तुम्हाला ?" जरा कोरडेपणानेच ती बोलली.

"ते मी नेहमीच देत असतो. त्याशिवाय माझा अहंकार सांभाळणं कठीण जातं मला."

"अगदीच वाईट सवय !" "माझ्या विचारण्याचा उद्देश एवढाच," ती पुढे म्हणाली, "की माझ्या मित्रांचा उल्लेख ऐकून तुमच्या मनात कुठले विचार आलेत ?"

"विचार अनेक आलेत. पण ते सगळेच सारखे नसतात."

"मी नवतरुणी आहे, हे विसरताहात तुम्ही. नवकथा, नवकाव्याप्रमाणेच कशाचाच विधिनिषेध बाळगीत नाही मी. कसला विचार आला तुमच्या मनात ?" पुन्हा एकदा तिने विचारले.

मनाची काहीशी तयारी करीत मी म्हणालो : "तुझी फिगर····"

या वेळी मात्र ती चांगलीच दचकली. एकदम तिच्या शरिराची चर्चा मी करीन हे तिच्या कल्पनेतही आले नसावे. अभावितपणेच तिच्या तोंडून एक आश्चर्योद्गार निघाला.

पण, इतक्या सहज हार मानण्याचा तिचा स्वभाव नव्हता.

आश्चर्य झटकीत, आणि तिचे नेहमीचेच हास्य फुलवीत ती म्हणाली :

"माझ्या फिगरबद्दल काय ?"

"फार चांगली आहे. आणि....."

"थांबा." मला तिने मध्येच अडविले. नवीन डाव टाकण्याची संधी तिला मिळाली असावी, तो आनंद तिच्या डोळ्यात लकाकत होता.

"पुढचं मी सांगते तुम्हाला. माझ्या फिगरची अगदी सविस्तर वर्णनं पाठ आहेत मला. ऐकली आहेत मी ती अनेकदा." अखेरच्या शब्दावर आघात देत ती म्हणाली. विजयाचा आनंद तिला लपविता आला नाही. ती सरळ सरळ हसत होती. हसण्यात आव्हान होते.

माझ्या काळजाशी एकदम उंदीर कुरतडू लागला. पिवळ्या गांधीलमाशीने माझ्या मेंदूचा कडकडून चावा घेतला. पण चेहऱ्यावर कुठलीच वेदना दाखवून मला चालण्यासारखे नव्हते. डोळ्याआडून डोकावू पाहणारी कळ दाबीत मी म्हणालो :

"अशी फिगर क्वचितच पाहायला मिळते."

"ते का ? नुसत्या पाहायला अनेक मिळू शकतात." टोमणा, आणि वर जेत्याचे हास्य.

"पाहायला, म्हणजे, वास्तविक हाताळायला म्हणायचं होतं मला." सहज बेफिकीरीचा आव आणीत मी म्हणालो.

आणि यावेळी मात्र तिचा तोल सपशेल गेला. तिच्या चेहऱ्यावर चिडखोरपणा दिसू लागला. चिडक्या आवाजातच ती म्हणाली.

"म्हणजे अनेक हाताळल्या आहेत तर तुम्ही?" मी उत्तर देण्याचे टाळले. त्यानंतर क्षणिक शांतता.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

हिने यापेक्षा अधिक घसरू नये हा विचार माझ्या मनात येतो तोच चेहरा पूर्ववत करीत ती उठून उभी राहिली. तिने स्वतःशी काही एक निश्चय केला असावा.

"येते, सर मी. पण जाण्यापूर्वी तुमची क्षमा मागायला हवी"

"कशाबद्दल ?"

"तुम्हाला शिष्ठ, अहंकारी वगैरे म्हटल्याबद्दल."

"त्यात काय विघडलं ? उळट तुझा स्पष्ट-वक्तेपणा आवडला मला."

"तरी पण कुणाला अगदी त्याच्या तोंडावर वाटेल ते बोलायचं म्हणजे.... तुम्हाला इतक्या रोक-ठोकपणे असं बोलणारी बहुधा मीच पहिली असावी."

तिचा दुखावलेला अहंकार तिला स्वस्थ वसू देत नव्हता हेच खरं.

"मुळीच नाही. यापूर्वीही ऐकलंय् मी हे."

"कुणाकडून ? आणि इतक्या स्पष्टपणे ? काहीशा अविश्वासाने तिने विचारले.

"हूं. माझ्या वर्गमैत्रिणीकडून."

"प्रसंग ?"

"सहलीचा. बसमध्ये मुद्दाम माझ्या शेजारी ती येऊन बसली होती. केवळ ही तक्रार मला ऐकवण्या-करिता."

"तक्रार ?"

"दुसरं काय ?"

"तुमच्यावर काही परिणाम झाला का ?" स्मित करीत तिने विचारले. या वेळी प्रथमच तिच्या आवाजात थोडेसे कौतुक होते.

"माझा अहंकार आणखीच वाढला."

विजू खळखळून हसली. लढाऊ पवित्रा तिने टाकून दिला. त्यावद्दलचे दुःख सुद्धा नव्हते.

"ती तुमची मैत्रीण तुमची सौ. होणार असेल बहुतेक." कुतुहलाने तिने विचारले.

"यापूर्वीच ती एका बड्या ऑफीसरची सौ. झाली आहे."

उत्तर ऐकून विजू खूष झाली. या वेळी प्रथमच तिच्या चेहऱ्यावरची प्रसाधनं ओघळून गेलीत. निरागस आणि निखळ आनंदाने खिदळत तिने विचारले :

"अखेर तुमची सुद्धा जिरवणारी कुणीतरी भेटली तर ? शेरास सव्वाशेर ?"

"एकच का ? अनेक !"

"आणि तरी देखील तुमचा हा एवढा अहंकार ?"

"अहंकार खरा; पण फार नम्र स्वरूपाचा. असं पाहा, विजू, जगात सर्वच गोष्टी आपल्याला जिकण्यासारख्या नसतात. शिवाय कित्येकदा पराभवात सुद्धा मजा असते. खिलाडूपणा मात्र हवा."

माझे आवाहन फुकट गेले असावे. शरीराखेरीज दुसरा धर्म न मानणारी विजू इतकी स्वस्त व्हायला तयार नव्हती. केवळ शरीराकरिता जगूनही ती शरीराची गुलाम नव्हती.

"Thank you" ती थंड आवाजात म्हणाली आणि नंतर एकदाही मागे वळून न पाहता झर्ऽदिशी निघून गेली.

डिसोझाचा म्हणून तिने आणलेला फॉर्म तिथेच होता.

फॉर्म कोरा होता.

मी खिडकीकडे वळलो. विजू लगवगीने जात होती. तेवढ्यात जवळच्याच हॉटेलातून डिसोझा घाईने बाहेर निघाला. तो तिची वाट पाहात तिथे बसला असावा.

विजूने मात्र त्याच्याकडे वळूनसुद्धा पाहले नाही. समोरून येणारी टॅक्सी तिने हात हालवून थांबवली, आणि क्षणभरात पाहता पाहता दृष्टीआड झाली.

डिसोझाला खूप खूप हसावे असे मला वाटले. पण छट् ! त्या हसण्यात प्रयत्न करूनही मला जीवच ओतता येईना !

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

राजगुरू संत सेना

श्री. वि. गुजर, एम्. ए. वी. टी., नांदुरा

महाराष्ट्र म्हणजे महंत राष्ट्र. महाराष्ट्र म्हणजे संतांनी पावन केलेली भूमी. या भूमीत अनेक संतांनी अवतार घेतले. भागवत धर्माचा ज्ञानेश्वरांनी महाराष्ट्रात पाया घातल्यानंतर संतांची मालिका महाराष्ट्रात निर्माण झाली. त्यांनी विठ्ठलाच्या भक्तीचे लोण सामान्य लोकांपर्यंत नेऊन पोहोचविले आणि आश्चर्य असे की, महाराष्ट्रातील जातीत संत निर्माण झाले. शिप्यात नामदेव, माळ्यात सावता माळी, कुंभारात गोरा कुंभार, महारात चोखामेळा, न्हाव्यात सेना न्हावी हे संत निर्माण होऊन त्यांनी भागवत धर्माचा प्रसार केला.

यापैकी अगदी थोडया संतांनी स्वत:बद्दल माहिती लिहून ठेवली असली तरी बऱ्याच संतांनी स्वत:च्या जीवनाविषयी चरित्रपर माहिती लिहून ठेवली नाही. त्यामुळे त्यांच्याबद्दल माहिती गोळा करण अत्यंत जिकिरीचे काम झाले आहे. संतांचे मुख्य लक्ष परमेश्वराची भक्ती करण्याकडे असल्यामुळे त्यांनी आपल्या काळाची सामाजिक, राजकीय स्थिती कशी होती याबद्दल माहिती लिहून ठेवली नाही. त्यामुळे संतांचे स्थल, काल व चरित्र याबद्दल विश्वसनीय अशी माहिती मिळत नाही.

राजगुरू संत सेना न्हावी यांच्याबद्दल माहिती मिळविण्याची साधने पुढील प्रमाणे आहेत :—

मराठी साहित्यातील साधने—(१) नामदेव महाराज यांच्या अभंगांची गाथा—आवटे, (२) भक्तीविजय–अध्याय ३४–महिपतीबाबा ताहराबादकर, (३) मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड १ला—पांगारकर. (४) महाराष्ट्र सारस्वत—आवृत्ती दुसरी–भावे— या ग्रंथाची पुरवणी —तुळपुळे, (५) संत काव्य समालोचन—खंड १ला-ग्रामोपाध्ये, (६) समर्थ वाग्देवता मंदिर धुळे येथील हस्तलिखित पोथी, (७) सकल संत गाथा, (८) संत समागम—भ. श्री. पंडित व (९) दैनिक मातृभूमी मधील "श्रीसंत सेना पुण्यतिथी" हा श्री. नागानन्द यांचा लेख. ता. २४-८-६५.

हिंदी साहित्यातील साधने—(१) भक्तमाल—नाभाजी, (२) शिखांचा ग्रंथसाहेब, (३) मिश्र बंधु विनोद भाग १ तृतीय संस्करण, (४) रजत जयंती ग्रंथ—राष्ट्रभाषा प्रचार समिती वर्धा व श्री. क्षीरसेन वंशप्रकाश.

सेनाजींचा काळ—

वरील निरनिराळ्या ग्रंथात सेनाजींच्या काळाबद्दल असलेल्या उल्लेखात ताळमेळ बसत नाही.

हिंदी साहित्यकार इ. स. १४०१ म्हणजे शके १३२३ म्हणजे संवत १४५५ हा सेनाजींचा कविता काल मानतात. मिश्रबंधु विनोद भा. १ या मध्ये सेनाजींच्या काळाबद्दल पुढील प्रमाणे उल्लेख आहे. "सेनानाई रीवाँवासीका कविता काल सं. १४५७ के लगभग था।"

श्री. गुलाबराय एम्. ए. यांनी "हिन्दी साहित्य का सुबोध इतिहास" या ग्रंथात सेनापतींचा जन्म संवत् १६४६ दिला आहे. श्री. भ. श्री. पंडित यांनी हिंदी साहित्यातील कवी सेनापती व सेना न्हावी हे एकच आहेत असे विधान 'संत समागम' या पुस्तकातील संत सेना न्हावी या लेखात म्हटले आहे. पण सेनापती हा जातीचा कान्यकुब्ज ब्राह्मण होता. सेनापती म्हणजे सेना न्हावी नव्हे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

श्री. पंडित यांच्या म्हणण्याप्रमाणे सेनापती म्हणजेच सेना न्हावी असे जर मानले व श्री. गुलाबराय यांनी दिलेला सेनापतीचा जन्म संवत् १६४६ हा मानला तर सेना न्हावी यांच्याबद्दल नाभाजीने संवत् १६४२ च्या जवळपास लिहिलेल्या "भक्तमाल" ग्रंथात सेना न्हावी यांच्याबद्दल त्यांचा जन्म होण्यापूर्वी छप्पया कशी आली ?

सनापती व सेना न्हावी यांची गल्लत केल्यामुळे हा घोटाळा निर्माण होतो. सेनापतीचा व सेना न्हाव्याचा वास्तविक पाहता नामसादृश्यापलिकडे अर्थाअर्थी कोणताही संबंध नाही.

श्री. ग्रामोपाध्ये यांनी १४व्या शतकातील एक संत कवी सेना होय असा उल्लेख केला आहे.

श्री. नागानन्द यांनी आपल्या ता. २४–८–६५ च्या मातृभूमीमधील "श्रीसंत सेना पुण्यतिथी" निमित्त लिहिलेल्या लेखात पुढील प्रमाणे वर्णन केलेले आहे. "स्वामी रामानंदाच्या शिष्यात संत सेना व संत कबीर हेच प्रमुख गणले जात असत. ज्ञानेश्वरांचे वडील श्री. विठ्ठलपंत हे स्वामी रामानंदाचे शिष्य म्हणूनच विठ्ठलपंत हे सेनाजीचे गुरूबंधू होते. ज्ञानेश्वरादी सारी भावंडे म्हणूनच सेनाजीस काकाच म्हणत असत." हे विधान सत्य मानल्यास सेना हे विठ्ठलपंतांचे समकालीन होते हे सिद्ध होते. ज्ञानेश्वरांनी इ. स. १२९६ मध्ये समाधी घेतली. यापूर्वी ज्ञानेश्वरांचे बालपण सेनांनी पाहिले असावे असे मानावे लागते. वास्तविक पाहता विठ्ठलपंत हे श्रीपाद स्वामी यांचे शिष्य होते. ते रामानंदाचे शिष्य नव्हते. परंतु नागानंदांनी त्यांना रामानंदाचे शिष्य म्हटले आहे.

जनाबाईनी सेनाजींच्या चरित्रपर एक अभंग लिहिला आहे. याचा अर्थ एवढा निश्चित होतो की, सेनाजी जनाबाईच्या पूर्वी झालेले असावे किंवा जनाबाईचे समकालीन तरी असावे. संत नामदेवांचा मृत्यू इ. स. १३५० मध्ये झाला, ही गोष्ट मराठी ग्रंथकारांनी मान्य केलेली आहे. जनाबाई देखील नामदेवाबरोबर मृत्यू पावली. म्हणजे जनाबाईचा मृत्यू इ. स. १३५० मध्येच झाला. यापूर्वी तिने सेनाजीबद्दल अभंग लिहिला असावा. "सेना न्हावी हा संत ज्ञानेश्वरांच्या संतमंडळातील आणखी एक कवी आहे" असे महाराष्ट्र सारस्वत–चवथी आवृत्ती – पुरवणी संपादक श्री. तुळपुळे यांनी मान्य केली आहे. श्री. म. श्री. पंडित समजतात त्याप्रमाणे जनाबाईचा सेनाजीबद्दलचा तो अभंग प्रक्षिप्त नाही.

सेनाजींचा जन्म विक्रम संवत् १३५७ म्हणजे इ. स. १३०१ मध्ये झाला, असे "श्रीक्षीर सेन वंश प्रकाश" या ग्रंथात म्हटले आहे.

कै. भावे व श्री. शं. पु. जोशी यांच्या मते मात्र हा कवी इतका प्राचीन नसून त्याचा काळ ते थोडा अलीकडचा मानतात.

सेना उत्तरेकडील किंवा दक्षिणेकडील ?

रजत जयंती ग्रंथात सेनाजीबद्दल पुढील माहिती आहे. "सेना नाई–इनकी मी प्रसिद्ध सन्तों में गणना है । कोई इन्हे उत्तर भारतीय मानते हैं पर अधिक प्रमाण इनके महाराष्ट्रीय होने के ही हैं ।" परंतु हे प्रमाण कोणते ते दिलेले नाहीत.

श्री. तुळपुळे यांनी महाराष्ट्र सारस्वत–चवथी आवृत्ती पुरवणीमध्ये सेना न्हावी यांच्याबद्दल पुढीलप्रमाणे माहिती दिली आहे. "न्हावी जातीतील हा संतकवी जबलपूर जवळील बांदूगड येथील राजाच्या पदरी नोकर होता. याची मातृभाषा हिंदी पण पंढरीचा वारकरी असल्यामुळे तो मराठी भाषाही उत्तम जाणे. याचे नाव सैन असून त्याचे अनुयायी पंजाबापासून राजपुतान्यापर्यंत आढळतात. पंजाबातील न्हावी सैन भक्ताचे नाटक करतात. त्यातही तो उत्तरेकडील म्हणूनच दाखवितात. हा अस्सल मराठी असता तर महाराष्ट्रात त्याचा थोडा तरी संप्रदाय असावयास पाहिजे होता. पण दक्षिणेतील न्हाव्यांना सेनाचे नावही ठाऊक नाही. उलट उत्तरेकडे याची मंदिरे, मठ व अनुयायी किती तरी आहेत. शिखांच्या ग्रंथसाहेबात याचे एक पद्य आहे. वरील पुराव्यावरून सेना न्हावी हा मूळचा महाराष्ट्रीय नव्हे, असे मत श्री. शं. पु. जोशी यांनी (पंजाबातील नामदेव पृ. २५–२६ मध्ये) मांडले असून ते मनास पटते. परंतु आश्चर्याची गोष्ट ही, की या हिंदी कवीची सर्व रचना केवळ मराठीतच आहे" यावरून सेना जरी मूळचा उत्तरेकडील असला तरी महाराष्ट्र ही त्याची कर्मभूमी होय. उत्तरेकडून तो महाराष्ट्रात आला. येथे त्याने आपल्या आयुष्यातील बराच काळ ज्ञानेश्वरादी संतांच्या सहवासात घालविला. ज्ञानेश्वराने जेव्हा समाधी घेतली तेव्हा सेना उपस्थित

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

होता. ज्ञानेश्वरांच्या सांगण्यावरून सेना पुन्हा उत्तरेकडे गेला व तेथे त्याने भागवत धर्माचा प्रसार केला.

सेनाजींचे चरित्र—नामाजींनी सेनाजीबद्दल पुढील छप्पय लिहिला.

" विदित बात जग जानिये हरि भये सहायक सेनके ॥
प्रभुदास के काज रूप नापित को कीनो ॥
क्षुप्र छुरहरी गही पानि दर्पण तहँ लीनो ॥
तादृशि ह्वै तिहिकाल भूपके तेल लगायो ॥
उलटि राव भयो शिष्य प्रगट परचौ जब पायो ॥
श्याम रहत सम्मुख सदा ज्यों बच्छा हित धेनु के ॥
विदित बात जग जानिये ॥ "

विनोद भाग १—मिश्र बंधू—तृतीय संस्करण मध्ये सेनाबद्दल पुढील माहिती आहे.

" सेन नाई रीवाँवासी का कविता काल सं. १४५७ के लगभग था। यह स्वामी रामानन्द के शिष्य थे। इनकी कविता सिख्खों के ग्रंथसाहब में है। कहते हैं कि रीवाँ के महाराजा इस महात्मा के शिष्य हो गये थे। "

मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड १ मध्ये कै. पांगारकर यांनी सेनाच्या चरित्राबद्दल माहिती दिली नाही. त्यांनी फक्त सेनाजींच्या काव्याचे विवेचन केले आहे.

संत जनाबाईंनी संत सेना न्हावी यांच्या चरित्र-पर एक अभंग लिहिला आहे. हा अभंग संत नामदेव यांच्या अभंगांच्या गाथेत दिलेला आहे. तो असा—

" सेना न्हावी भक्त भला । तेणे देव भुलविला १
नित्य जपे नामावळी । लावी विठ्ठलाची टाळी २
रूप पालटोनि गेला । सेना न्हावी विठ्ठल झाला ३
काखे घेऊनी धोकटी । गेला राजियाचे भेटी ४
आपुले हाते भार घाली । राजियाची सेवा केली ५
विसर तो पडला रामा । काय करू मेघश्यामा ६
राजा अयनियांत पाहे । चतुर्भुज उभा राहे ७
दूत धाडूनिया नेला । राजियाने बोलविला ८
राजा बोले प्रीतिकर । रात्री सेवा केली फार ९
राजसदना प्रती न्यावे । भीतरीच घेउनी जावे १०
आता बरा विचार । सेना म्हणे करू काय ११
सेना न्हावी गौरविला । राजियाने मान दिला १२
कितीकांचा शीण गेला । जनी म्हणे न्हावी झाला १३

सेनाजींच्या चरित्राबद्दल पुढील माहिती मिळते.

सेनाजींचे घराणे—सेनाजी मूळचे बांधवगड येथे राहणारे होते. सुमारे साडेसहाशे वर्षांपूर्वी हे शहर अतिशय भरभराटीस आले होते. पूर्वी याच ठिकाणी बुंदेलखंडातील रेवा संस्थानची राजधानी होती. बांधवगडचे अधिपती रजपूत वंशातील राजाराम महाराज हे होते. त्यांच्याकडे देविदास नावाचा न्हावी राजसेवा करण्यासाठी नेमलेला होता. त्याच्या पत्नीचे नाव राजकुंवर बाई असे होते. दोघेही पुण्यशील व दयाळू होते. साधुसंतांची सेवा करण्यात त्यांना अतिशय आनंद वाटत असे. त्यांच्या पोटी सेनाचा जन्म झाला. आपल्या जन्माबद्दल त्याने पुढील अभंग लिहिला आहे.

" असता वैकुंठासी । काय सांगे हृषीकेशी ॥
जाऊनी मृत्युलोकासी । जन भक्तीसी लावी का १
आज्ञा वंदुनिया शिरी जन्मलो । न्हावीयाचे उदरी ॥
वाचे नाम निरंतरी । रामकृष्ण गोविंद " २

बालपण—बालपणापासूनच सेनाचे लक्ष परमेश्वराकडे लागले होते. त्यांची स्मरणशक्ती दांडगी होती. एकदा त्यांनी कोणतीही पदे ऐकली म्हणजे त्यांच्या ती पदे लक्षात राहत असत. परमेश्वराचे नामस्मरण करावे, त्याची पूजा करावी व त्याचे दर्शन घ्यावे, याकडे सेनाचे लहानपणापासून लक्ष होते.

गुरूचा उपदेश—सेनाजींचे वडील देविदासजी हे रामानंद स्वामीजींचे परम शिष्य होते. एकदा देविदासजी राजदरबारकडे राजसेवा करण्यासाठी जात होते रस्त्यात त्यांना रामानंद भेटले. स्वामीजी त्यांच्याच भेटीस आल्याचे त्यांना कळले तेव्हा देविदासजींनी स्वामीजींची सेवा व आदरातिथ्य करण्यासाठी सेनाजीला घरी पाठविले. सेनाजीने त्यांची यथायोग्य सेवा केली. स्वामीजींनी आपणाला उपदेश करावा अशी नम्र विनंती सेनाजीने स्वामीजीस केली. तेव्हा स्वामीजींनी सेनास उपदेश केला. तेव्हापासून सेना हे स्वामी रामानंदाचे शिष्य बनले. हीन कुळात जन्म मिळाला याबद्दल त्यांना वाईट वाटत नव्हते कारण परमेश्वरानेच आपणाला भक्तीमार्गाचा प्रसार करण्यासाठी या हीन जातीत पाठविले आहे, असे ते समजत. आपल्या वंशा-बद्दल त्यांनी एक अभंग लिहिला आहे. ते जसे जातीने न्हावी होते तसेच ते 'परमार्थात देखील न्हावी होते. ते आपल्या अभंगात म्हणतात—

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

" आम्ही वारीक वारीक । करू हजामत बारीक ।।१।।
विवेक दर्पण आयना दावू । वैराग्य चिमटा हलवू ।।२।।
उदक शांति डोई घोळू । अहंकाराची शेंडी पिळू ।।३।।
भावार्थाच्या बगला झाडू । कामक्रोध नखे काढू ।।४।।
चौवर्णा देऊनी हात । सेना राहिला निवांत ।।५।। "

सेनाच्या घराण्यात विठ्ठलाची भक्ती त्याच्या वाडवडिलांपासून चालत आली होती. त्याबद्दल सेना म्हणतात—

" ही माझी मिराशी । पांडुरंग पायापाशी ।।
करीन आपुले जतन । वागवितो अभिमान ।।
जुनाट जुगादीचे । वडिले सांघियले साचे ।।
सेना म्हणे कमळापती । पुरातन हे माझी वृत्ती ।। "

विवाह— पुढे सेनाजींचा एका सुलक्षणी मुलीशी विवाह करण्यात आला. काही काळ लोटल्यानंतर देविदासजींनी राजसेवेची जबाबदारी सेनाजीवर टाकली. संसार व परमार्थ ते योग्य तऱ्हेने पार पाडू लागले.

चमत्कार—भक्तिविजयातील ३४ व्या अध्यायात सेनाच्या जीवनात घडलेल्या चमत्काराचे वर्णन केलेले आहे. त्याचा सारांश पुढीलप्रमाणे—

" एके दिवशी सेना स्नान करून पूजा करावयास बसला. राजसेवा करण्यासाठी राजाने सेनाला ३–४ वेळा बोलावणे पाठविले पण त्याच्या पत्नीने 'घरी नाहीत,' असे त्यांना सांगितले. एका दुष्ट शेजाऱ्याने राजाकडे माहिती सांगितली, की सेना घरीच आहे. तो येत नाही असे पाहून राजाला राग आला व सेनाची मोट बांधण्याचा त्याने हुकूम सोडला.

" विठ्ठलाला भक्ताची दया आली. त्याने सेनाचे रूप घेतले व तो राजाकडे गेला. सेना आलेला पाहून राजाला आनंद झाला. त्याने राजाची श्मश्रू करण्यास सुरुवात केली. राजाने जेव्हा खाली मान करून वाटी-तील पाणी पाहिले तेव्हा त्याला चतुर्भुज रूप वाटीत दिसले. राजा अतिशय खूष झाला. राजाने त्याला होन बक्षीस दिले. त्याने ते धोकटीत ठेवले व धोकटी सेनाच्या घरी नेऊन ठेवली.

" दोन प्रहरी सेनाला राजाकडे जाण्याची आठवण झाली. तो जेव्हा राजाकडे जाऊन उशीर झाल्याबद्दल क्षमा मागू लागला तेव्हा राजाला आश्चर्य वाटले. त्याच्यापूर्वी येऊन राजसेवा करून गेलेला तो कोण असावा, असा राजास प्रश्न पडला. सनान धोकटी उघडून पाहिली तेव्हा त्याला त्यात राजाने दिलेले होन दिसले. ते त्याने ब्राह्मणास वाटून दिले. परमेश्वरच सेनाचे रूप घेऊन आला असावा, अशी राजाची खात्री पटली. परमेश्वराने पुन्हा आपणाला दर्शन द्यावे म्हणून राजाने सेनास आग्रह केला. आपल्यामुळे परमेश्वरास त्रास झाला म्हणून सेनाला अतिशय वाईट वाटले. भक्ताची प्रतिष्ठा ठेवण्यासाठी विठ्ठलाला पुन्हा प्रगट व्हावे लागले. तेव्हापासून राजाने त्याचे शिष्यत्व पत्करले. सेनाजी राजगुरू बनले." पुढे जवळजवळ साडेतीनशे वर्षेपर्यंत बांधवगडच्या राजगुरुस्थानी सेना-जींचा वंश होता असे नागानन्द यांचे म्हणणे आहे.

ज्या राजाच्या दरबारी हा प्रसंग घडला तो राजा अविंध होता. त्याचे नाव महिपतीबाबांनी दिलेले नाही.

" संत काव्य समालोचन खंड १ " लिहिणारे ग्रामोपाध्ये यांच्या मते तो राजा म्हणजे वेदरचा अल्लाउद्दीन बहामनी असाव.,

कार्य— संत सेना यांनी महाराष्ट्रात भागवत धर्माचा प्रसार केला. ज्ञानेश्वरांच्या सांगण्यावरून ते महाराष्ट्राबाहेर उत्तर प्रदेशात गेले. त्यांनी श्रीक्षेत्र काशी येथे भागवत संप्रदायाची स्थापना व भक्ति-मार्गाचा प्रसार केला. आजही काशीच्या त्या भागाला 'सेनपुरा' असे म्हणतात.

निर्याण—सेनाजीला आपल्या निर्याणाची वेळ आधीच समजली होती. त्याबद्दल त्यांनी एक अभंग लिहिला आहे—

" श्रावण वद्य द्वादशी । सेना बैसे समाधिसी ।।
करितो विनवणी । हात जोडुनिया दोन्ही ।।
हेचि द्यावे मज दान । करा हरिचे चिंतन ।।
जातो सांगुनिया मात । पांडुरंग बोलावित ।।
सोडा द्वादशीचे पारणे सुखे करावी किर्तनें ।।
दिवस मध्यान्ही आला । सेना वैकुंठासी गेला ।।
माझे झाले स्वहीत । तुम्हा सांगतो निश्चित ।।
करा हरीचे चिंतन । गावे उत्तम हेच गुण ।।
श्रावण वद्य द्वादशी । सेना बैसे समाधिसी ।। "

सेनाने फक्त श्रावण वद्य द्वादशी ही निर्याणाची तिथीच सांगितली आहे. वाराचे नाव व वर्ष दिलेले

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नाही. त्यामुळे त्यांचे निर्याण कोणत्या सालात झाले हे समजत नाही.

काव्य—या कवीचे सुमारे १५० मराठी अभंग आज उपलब्ध आहेत. त्याने मराठी भाषेचे मर्म जाणले होते. त्याचे मराठी भाषेवर प्रभुत्व होते. स्वतःच्या धंद्यातील काही खास शब्द आणि वाक्प्रयोग वापरून त्याने अध्यात्मावरील रूपके साधली आहेत.

शिखांच्या ग्रंथसाहेबात १६ संतांच्या काव्यांचे संकलन करण्यात आले आहे. त्यात सेनांच्या कवितांचा समावेश करण्यात आला आहे. ग्रंथसाहेबात त्यांचे पुढील पद आहे—

" राम भगति रामानन्द जानो ॥
पूरन परमानन्द बखाने ॥
मदन मूरति तारि गोविन्दे ॥
सेन भजे भज परमानन्दे ॥ "

सेनाची एक दोन हिंदी पदे समर्थवाग्देवता मंदिर धुळे येथील हस्तलिखित पोथीतून प्राप्त झाली आहेत.

सेनांच्या हिंदी कवितेचा नमुना पुढील प्रमाणे आहे.

" जब सों गोपाल मधुबनको सिधारे आली ॥
मधुबन भयो मधुवानव विरदम सों ॥
सेन कहे सारिका, सिखंडी, खंजरी ॥
सुक मिलिके कलेश कीनो कालिंदी कदमसों ॥"

विदर्भ साहित्य संघ प्रकाशन—

प्रयोगक्षम मराठी नाटके

ले.—डॉ. मु. श्री. कानडे, पुणे किंमत रु. १५–००

आरंभापासून आजपर्यंत जी नाटके रंगभूमीवर आली त्यांच्यासंबंधी थोडक्यात माहिती देणारा मराठीतील पहिलाच सूचिग्रंथ.

" मराठी वर्णोच्चार–विकास "

लेखक—प्राचार्य डॉ. द. ह. अग्निहोत्री

(मराठी भाषेच्या अभ्यासकांसाठी उपयुक्त संशोधनग्रंथ)

पृष्ठे–४६८ डेमी जाड टिकाऊ बांधणी मूल्य रु. १६–००

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

काही क्षण

—बाळकृष्ण बन्नोरे

रोज जरी नाही, तरी बरेचदा दिवसाचे काही क्षण असे येतात की जेव्हा मनुष्य अगदी पुतळ्यासारखा बसून असतो किंवा तसे बसावेसे वाटते म्हणा. झाडावरलं पान देखील हलू नये तसं त्याचं मन देखील हलत नाही. अशा वेळी, बाजूच्या वडाच्या पारंब्या जास्तच पिंजारलेल्या व लांबल्या वाटतात, समोरच्या रस्त्यावर मुलं उगाच खेळत असलेली दिसतात व ट्रक्स् निष्कारण आवाज करताना दिसतात, मध्येच एखाद्या इमारतीच्या वरच्या भिंतीत गवंड्याने विटा कशा ओबडधोबड रचलेल्या वाटतात...आणि असंच वर बघत असता आभाळाच्या कडा सावरलेल्या दिसताच त्यांच्या डोळ्याच्या कडा अकारणच ओलावतात. कोणाची तरी त्याला तीव्रतेने आठवण होत असावी किंवा कुणाच्या तरी साहचर्याची जरूर असावी असं काही नेमकं म्हणता येणार नाही पण मला वाटतं हा असाच काहीसा गूढ विचित्र क्षण असतो की, मनुष्य आराम खुर्चीत नुसता पडला असतो नि झर्रकन मध्येच कुठे डोंगरकुशीत लपून येत असतो तर कुठे टेकाडमाथ्यावरच्या कुरणावर गाल घासत बसतो.

कदाचित् हेच ते क्षण असतील एका चंचल अबोध शांतीचे की, जेव्हा मनुष्य पाषाणासारखा वाटतो पण पिसासारखा भिरभिरत असतो, निसटल्या क्षणलहरींना धरत असतो किंवा पुसलेल्या चित्रांना रंगवीत असतो, उमलेल्या फुलांना कुर्वाळीत असेल वा कलत्या सूर्य किरणांना डोळ्यात सामावून घेत असेल, कवीचं आर्तस्वल भावविश्व कदाचित् अशाच क्षणांना आकार घेत नसेल ज्यावेळेस तरळ कल्पना ढगाच्या आड जाऊन मिस्किलपणे सिवू-सुधाकरांचा खेळ बघत असेल किंवा उलणाऱ्या मातीचे रहस्य शोधायला एखाद्या गुहेत जाऊन बसलेला असेल. काहीही असो पण क्षण असे गरोदर असतात की मनाचा तळ घुसळून निघतो आणि उठलेली कळ एका अनामिक अस्थिर समाधानाला प्रसवून जाते.

या वेळेस मनुष्याला गर्दी किंवा कोलाहल नको असतो म्हणजे गर्दी त्याला वर्ज्य असते व एकांतप्रिय असतो, असं नाही. गर्दी हवीच पण जरा अंतरावर. कारण तो त्रयस्थासारखं बघू शकेल व त्यातला मी एक नव्हे ही थोडी अहंता सुखावल्या जाईल. आसावरीचे सूर दुरून यावेसे वाटतात, मैफलीत बसून नव्हे. आणि चैत्रयामिनीवर मोहनी घालणारी कामिनी अबोल ओठांनी त्याच्याजवळ सरकते आहे असं वाटावं इतक्या अंतरावर ती उभी असावी...लाटांचा खेळ पायाशी चालत रहावा पण तिच्या आवर्तात लपेटून जावं असं नाही...डोंगरकपारीतला एकांत नको म्हणालो ते या कारणानेच. सापेक्ष एकांतात जेवढा माणूस तद्रूप होऊ शकतो तो निरपेक्ष शांतीत रमलाच जात नसावा की काय? आणि लौकिकार्थाने उदासवाणे म्हटले जाणारे हे क्षण म्हणजे सृजनशाली सापेक्ष एकांताचे हे गजबजलेले उपवनच म्हणावे. कारण नियमित कालावधी आहे व त्यानंतर आपल्याला नेहमीच्या मार्गानेच परत फिरावयाचे आहे किंवा पुढे जावयाचे आहे. अविरत फिरणाऱ्या कालचक्राच्या परिघावर क्षणकाळ स्तब्ध उभे राहून आपलीच गती बघण्याचा हा मानवी स्वभावाचा खेळ म्हणजे लाटांनी थोडा वेळ किनाऱ्यावर थांबून आपला जलविस्तार तिरक्या डोळ्यांनी बघण्यासारखा मनोरंजक नाही असं कोण म्हणेल ?

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

स्वभाव-वैशिष्ट्य

लक्ष्मीबाई टिळक व रमाबाई रानडे

भारतीय संस्कृतीच्या अष्टपैलू गुणांची परंपरा पुरुषापेक्षा कणभर अधिक अशी स्त्री-वर्गाने कटाक्षाने कायम ठेवली आहे, असे आढळून येते.

प्रथितयश मराठी कवी, कै. रेव्हरंड टिळक यांनी ख्रिस्ती धर्माची दीक्षा घेतल्यानंतर, आपल्या पतिदेवांना सोडून राहणे, त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई यांना फार कठिण झाले. त्या काळात ज्या वडिलधाऱ्या नातेवाईकांनी त्याना आश्रय दिला त्यांचा अव्हेर करून, शेवटी केवळ यजमानांना एकटे टाकावयाचे नाही या भावनेने त्यांनी स्वतः बाप्तिस्मा घेतला. असे करताना पण, हट्ट असा की युरोपियन धर्मोपदेशकाकडून बाप्तिस्मा घेणार नाही, म्हणून भारतीयाकडून दीक्षा घेतली. पुढे, प्लेगसारख्या साथीच्या रोगाने विशेषतः गरीब व मागसलेल्या लोकांतून, फार मोठया प्रमाणात, प्लेगची लागण होवू लागली तेव्हा झोपडया बांधून रोग्यांची शुश्रुषा करण्याचे लक्ष्मीबाईंनी, जे पुण्यकर्म केले त्याविषयी युरोपियन मिशनऱ्यांनी आश्चर्याने तोंडात बोटे घातली.

कै. न्यायमूर्ती रानडे यांच्या दिवंगत पत्नी रमाबाई यांच्या स्वभाव-वैशिष्टयाची अशीच गोष्ट आहे. स्त्रियांच्या उन्नतीच्या कळकळीने त्यांनी, सेवासदन स्थापन करून आपली जी आठवण मागे ठेवून गेल्या ती आपल्याला विदीतच आहे. पण रानडयांच्या हयातीत त्यांचे यजमान जस्टिस रानडे मुंबईच्या हायकोर्टात न्यायाधीशाच्या कामावर असताना, मुंबईला प्लेगच्या साथीचा जो तडाखा बसला त्यात, रानडयांच्या घरातील नोकरमाणसे प्लेगला बळी पडली.

या नोकर-चाकरांच्या शेवटच्या दुखण्यात, रमाबाईंच्यापुढे धर्मसंकट उभे राहिले. रानडयांना चाकर आजारी आहेत असे कळवले तर ते कोर्टाचे काम सोडून, स्वतः त्या चाकराच्या भेटीला, इस्पितळात जातील हे जाणून रमाबाईंनी त्यांना काहीही न कळवता, त्या दुपारी इस्पितळात जावू लागल्या. रविवारला लागून शनवारी हायकोर्टाला सुटी होताच गाजावाजा व करता त्यांनी रानडयांना लोणावळयाला नेले. तिथे खरी वस्तुस्थिती त्यांना सांगितल्यावर जेव्हा रानडे तडक परत येण्यास निघाले, तेव्हा अत्यंत हळुवारपणे त्यांची समजूत घालून, त्या स्वतः मुंबईला परतल्या व नोकरचाकरांच्या शेवटच्या क्षणापर्यंत त्यांची पूसपास केली.

सर जॉन व लेडी सायमन

सर जॉन सायमन, हे गेल्या पीढीतील प्रथितयश असे विलायतेतील वकील होते. कायद्याचे ज्ञान व हाती घेतलेल्या खटल्यात अत्यंत परिश्रम करण्याची त्यांची सवय या बाबींशिवाय, व्यवहारातील त्यांचा सरळपणा व सालस, शांत वृत्ती या त्यांच्या गुणांमुळे त्यांचा लौकिक द्विगुणित झाला होता. विलायतेत व आपल्या देशात गाजलेल्या "चिरोल" खटल्यात ते लोकमान्य टिळकांचे वकील होते. राजकारणात पडण्यापूर्वी, भौतिक सुखाच्या दृष्टीने, एखाद्या संस्थानिकाला शोभेल अशी त्यांची सांपत्तिक स्थिती होती.

त्यांची बुद्धिमत्ता, व्यासंग व वक्तृत्व, या गुणांचा राजकारणात उपयोग होईल म्हणून कॉन्झर्वेटिव्ह पक्षाने त्यांना राजकारणात ओढले व पार्लमेंटमध्ये ते निवडून आले. ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या विस्तृत परिसरात, अनेक नाजुक व गुंतागुंतीच्या कामावर

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्यांचे नियोजन झाले होते व ब्रिटिश पार्लमेंटचे ते आधारभूत असे सभासद होते.

परंतु राजकारणात पडण्यापूर्वी जेव्हा त्याला वकिली सोडावी लागली तेव्हा पुढेमागे मंत्रिपद लाभले तरी जेमतेम निर्वाह चालेल एवढचाच प्राप्तीची अपेक्षा असल्यामुळे त्यांनी त्यांच्या पार्टीच्या लोकांना एकदम होकार दिला नाही.

वकिलीच्या पूर्वकाळीच त्यांच्या पत्नीने त्यांना धीराने साथ दिली होती. पुढे कामाचा व्याप वाढल्यावर त्यांच्या सुखसोयीकडे कटाक्षाने लक्ष ठेवून त्यांचा श्रम-परिहार होईल अशा वृत्तीने संसार केला होता. अशा परिस्थितीत, राजकारणात पडल्यावरही आपल्या पत्नीचे सहकार्य लाभेल असा विश्वास असूनही आर्थिक दृष्टीने स्वार्थत्याग करण्यापूर्वी आपल्या पत्नीची संमती हवी म्हणून, त्यांनी लेडी सायमन यांना विचार करण्यास अवधी दिला. त्या विदुषीने दीर्घसूत्रीपणा सोडून त्याना म्हटले की, "आपल्या देशहिताच्या दृष्टीने आपल्या स्वार्थत्यागात सहभागी होण्याचा लाभ मिळत असताना आर्थिक अडचणी सोसण्याचे मनोधैर्य मला आपोआप येईल. तेव्हा तुमच्या राजकीय पक्षाच्या सूचनेला तुम्ही खुशाल रुकार द्यावा."

इंग्लंडच्या पंतप्रधानपदाची त्यांची आकांक्षा काहीना काही कारणाने सफल झाली नाही, याविषयी साहजिकच त्यांना विषाद वाटला असेल. पण त्यांनी लिहिलेल्या अत्यंत उद्बोधक अशा त्यांच्या आत्मचरित्रात त्यांनी, त्याविषयी अवाक्षरही काढले नाही,

सयाजीराव गायकवाड व अहिल्यादेवी होळकर

प्रथितयश इतिहासाचार्य, कै. गोविंदराव सरदेसाई यांनी बडोदे सरकारची व त्यातून प्रत्यक्ष सयाजीराव यांची एकनिष्ठपणे सेवा केली. "माझी संसार-यात्रा" या त्यांच्या आत्मचरित्रात, त्यांनी पुढील शब्दात, सयाजीराव यांचा गुणगौरव केला आहे. "सयाजीराव ही आधुनिक मनूची चिरस्मरणीय विभूती होय."

तथापि, आपले चरित्र सरदेसाई यांनी लिहावे अशी इच्छा जेव्हा सयाजीराव महाराजांनी प्रदर्शित केली तेव्हा सरदेसाई यांनी नकार दिला. त्यांनी म्हटले, "मी पगार-खाऊ सेवक, चरित्रनायकाचे गुण-दोष स्पष्ट सांगण्यास असमर्थ; व्यक्तीच्या पश्चात् चरित्र लिहिले जावे हा शाहण्यांचा रिवाज आहे."

वस्तुत: सयाजीराव सारख्या कर्तृत्ववान पुरुषाला स्वत:चे चरित्र लिहून घेण्याची इच्छा असावी यात गौण असे काही नव्हते. तरी पण स्वभाव वैशिष्ठ्याच्या दृष्टीने सरदेसायांचा दृष्टिकोनही यथार्थ होता. पुढे Sir Stanley Rice व सार्जंट यांना मोल देवून, महाराजांनी जेव्हा त्यांच्याकडून चरित्र लिहून घेतले, तेव्हा चरित्र लिहिण्यासाठी एकत्रित केलेली सर्व सामुग्री, सरदेसाई यांनी चरित्रकारांच्या स्वाधीन केली. प्रत्यक्ष स्वत: सरदेसायांनी चरित्र लिहण्याचे नाकारले ही गोष्ट महाराजांना रुचली नाही व त्या विषयीचा त्यांच्यावरचा महाराजांचा रोष हयातीपर्यंत कायम राहिला.

कुंभेरीच्या लढाईत मल्हाळराव होळकरांना वीर-मरण लाभल्यावर अहिल्यादेवी होळकरांनी दौलतीच्या कल्याणाविषयी सारासार विचार करून सती न जाता बरीच वर्षे राज्यकारभार सांभाळला. एवढेच नव्हे तर पतीच्या मरणानंतर शुभ्र वस्त्र व जपाची माळ या शिवाय दुसरे लेणे जवळ केले नाही. सामाजिक व धार्मिक बाबतीत त्यांनी केलेले महान् कार्य, आदर्श म्हणून चिरस्मरणीय होऊन राहिले ! त्यांच्या हयातीत एका विद्वान ब्राम्हणाने, या साध्वीचे चरित्र लिहून ते त्यांना समर्पण केले तेव्हा त्या चरित्रग्रंथाकडे क्षणभरही दृष्टी न वळवता अहिल्यादेवींनी, तिथल्या तिथे तो नर्मदा-नदीत सोडून दिला.

—र. द. सरंजामे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भाषा जुनी पण गाऱ्हाणे नेहमीचे

दरबारामध्ये मुख्य अधिकाऱ्याची किंवा वरिष्ठाची इतराजी झाली म्हणजे कशी स्थिती होते याचे मासले इतिहासात बहुत आहेत. दिनकर बाबूराव नावाच्या एका इसमावर नाना फडणविसांची इतराजी झाली, त्यामुळे त्यास तीन वर्षे नुसते दर्शन देखील झाले नाही. शेवटी त्याने नानांच्या मर्जीतला कोतवाल घाशीराम ह्याच्याकडे संधान बांधून, विष्णु-बागेत (सध्याची बेलबाग) एकदा दर्शनयोग आणविला यासंबंधाने त्याने लिहिलेले एक हृदयद्रावक पत्र उपलब्ध झाले आहे. ते मोठे वाचनीय आहे. ते येणे प्रमाणे—

श्रीअंबा प्रसन्न

"सेवेसी दिनकर बाबूराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती ऐसीजे—स्वामींनी कृपा करून कामकाज सांगितले याजमुळे लोकांचे देण्याचे पेचात. त्यांचा नित्य उपद्रव. उदरनिर्वाहास असाम्या होत्या त्याही दूर आहेत. वंदनकर लोकांचे कामकाज दुसरे करितात. त्याजकडे व खासगत कारकुनाकडे पाच रुपये येणे, ते कोणी ठिकाण लागो देत नाहीत. व उभे राहावयासी स्थल राहिले नाही. जे ज्याचे हातास लागले त्याणे बळकाविले. एक स्वामींचे रोषामुळे हे दशा प्राप्त जाली. त्यात कोणी इष्टमित्र शरीर-संमंधी भेटतात, ते 'सुभेदार' म्हणून विनोदेकरून बोलतात. ते मरणापेक्षा मरण होते! आज स्वामीचे तेज असे आहे, जर रोष केला तर मोठे मोठे अमित्रांचे अडत्रांश होऊन प्राण सुटणार. त्यात माझा मजकूर कितीक! इतराजी होताच प्राण जावा अगर देशांतरास जावे. परंतु स्वामींचे चरणाचे चिंतन एकनिष्ठपणे, यास्तव कुडीत प्राण धरून आज तीन वर्षे आहे. मोठा हेत होता की, एक वेळ नमस्कार करून अर्जी द्यावी. याकरिता सर्व मुत्सद्दी वगैरे यांचे आर्जव दोन वर्षे केले. परंतु कोणी अंगीकार न करीत. तेव्हा घासीराम कोतवाल यांस शरण गेलो. त्यांनी अंगीकार करून श्रीविष्णुवागेत स्वामींचे चरणाचे दर्शन करविले. परंतु समक्ष पाव घटका विनंती करावी हा हेत आहे. त्यास मला श्रीविष्णुस्वरूप स्वामी आपण आहेत. अवकृपा केल्यास परलोक साध्य होईल. कृपा केल्यास उभय लोक साह्य होतील. यास्तव अवकृपेची वा कृपेची जी आज्ञा करावयाची, ते कोतवाल यांस करावी. शासन करितील अथवा विजयादशमीचे मुहूर्ते समक्ष दर्शनास आणितील. मजविशी विनंती करावयाची ते करितील. हे विनंती वाचून आज्ञा आज व्हावी. कनिष्ठ बंधूचा पुत्र आहे तो लक्ष्मणपंत खेर यांचे स्वाधीन केला आहे. स्त्री व मी एक ब्राह्मणाचे घरी आहो. खासगत तापत्रय काय आहे, आणि उदया-पासून अस्तमान कसा लोटतो, याचा परिहार श्री जाणे. स्वामिकार्यांस हा देह तृणप्राय खर्च करीन. हे धैर्य पुरते आहे. स्वामी सर्वज्ञ, ते पक्षी आणीक काय विनंती करू. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना."

इतिहास संग्रह :
ऐतिहासिक टिपणे
(इतिहासकार पारसनीस)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

पुस्तक परीक्षणे

मनोगते

ले. वि. द. घाटे, मौज प्रकाशन, मुंबई. किं. ४ रु.

(त्यांनीच म्हटलं आहे माझ्या जीवनांत हमेशा दोन प्रेरणांचे द्वंद्वयुद्ध चालत असे—शिक्षण आणि वाङ्मय)

विठ्ठलराव घाटयांचं आणखी एक पुस्तक. तशी फार पुस्तकं नाहीत. पण सारी वैशिष्टयपूर्ण. नाटयरूप महाराष्ट्र आणि नाना देशांतील नाना लोक ही शालेय पुस्तकं सुद्धा त्या विषयावरील इतर सामान्य पुस्तकांपेक्षा किती तरी उठून दिसतात. विषयाकडे बघण्याची त्यांची दृष्टीच अशी intimate आहे की विषयाशी वाचकांची त्यांच्या ओळखीने जणू intimacy होते. काही म्हातारे आणि एक म्हातारी ह्यातील व्यक्तिचित्रांची ओळख अजून ताजी वाटते. विठ्ठलराव घाटयांना पुन: ज्यांनी लिहायला लावलं ते धन्य होत. 'दिवस असे होते' ह्यातील साहित्यिक घाटयांपेक्षा शिक्षक घाटे जास्त उजवे वाटतात. त्यात सुद्धा माधवराव आणि चंद्रशेखर ह्यांचे किती जवळून दर्शन घडते. यशवंतराव होळकर वगळल्यास त्यांची बहुतेक सारी पुस्तके मी वाचली आहेत. भूगोलाची पाठय पुस्तके सुद्धा ! (अर्थात् ती ऐतिहासिक नव्हेत.)

स्वतः घाटे शैलीकार आहेत. माटे शैलीकार होते ह्या अर्थाने नाही. पण सावीसरळ संभाषणांसारखी वाक्यं वापरणं घाटयांनाच साधते. वाक्य आणि विचार ह्यांचा पुरा समतोल त्यांना साधला आहे.

मनोगतातील हा उतारा पहा—महाराज युगपुरुष होते. कैक शतकात असा एखादाच महापुरुष निपजतो. हजार वर्षे आंधळेपणाने एका दिशेने चाललेल्या महाराष्ट्राच्याच नव्हे, तर भारताच्या इतिहासाला महाराजांनी थांबवले आणि दुसरी वाट करून दिली. महाराजांनी नवे युग जन्माला घातले, नवे सिंहासन स्थापले. आपण हे अलौकिक विभूतिमत्व जाणले पाहिजे. त्या उत्तुंग शिल्पाचे टवके काढीत बसणे हे करंटेपण. आपण ते सोडले पाहिजे. ही आंधळी भावडी नाही. जरूर आहे, पण ती डोळस, जागरूक आणि जाणती आहे ! तो महाराष्ट्र धर्म आहे !

त्यांच्याच भाषेत सांगायचे म्हणजे कुदळीला कुदळ म्हणणारी मराठमोळी भाषा आहे ही. एकच दृष्टांत पण किती समर्पक आणि विचाराशी जुळता. 'त्या उत्तुंग शिल्पाचे टवके काढीत बसणे हे करंटेपण !' पण किती अर्थवाही आणि प्रवाही !

घाटे स्वतंत्र शैलीकार असल्यामुळेच त्यांना 'स्वप्न साकार झाले' हा निबंध लिहावासा वाटला. ठराविक लकबी आणि ठराविक वळणापलीकडे जणू विचार व्यक्तच होत नाहीत अलीकडे. 'क्रमाक्रमाने स्वप्नाला आकार आला असणार' असं एक वाक्य मनोगतात आहे. क्रमाक्रमाने स्वप्न साकार झाले असावे असे वाक्य त्यांनाही लिहिता आले असते. 'उपस्थिती प्रार्थनीय आहे' असाही एखादा लेख घाटयांनी लिहावा ही विनंती.

प्रसन्नता आणि प्रगल्भता हे घाटयांच्या लेखनाचे दोन विशेष आहेत. प्रत्येक व्यक्तीची त्यांना कदर आहे. व्यक्तिविषयक कुचाळकी आणि हेटाळणी त्यांनी कधी केली नाही. एखाद्या बाळासाहेबांची humility insulting वाटली असली तरी लेखाची मांडणी निर्दोष understandingची असते. वनचुक्यांचा किस्सा सांगतील. दोषावर पांघरूण न घालता सांगतील. पण फिर्याद नाही. आक्रस्ताळेपणा नाही.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नाजुकसा चिमटा अवश्य घ्यावा पण वोचकारे घेऊ नयेत. आणि गुद्दे तर मारूच नयेत हा त्यांचा स्वभाव. विनोदावरील त्यांचे 'मनोगत' वघा !! जन्मभर मी विनोद करीत आलो आहे. तरी पण मला असे सांगावेसे वाटते की, विनोद असावा, पण तो तोंडी लावण्यापुरता असावा. निदान तो जेवणापूर्वीच्या अॅपिटाइझरसारखा असावा. कोणाच्या हृदयाला जखम होईल, कोणाला झोंबेल, कोणाच्या खाजगी चरित्रावर किंवा अंगावर त्याच्यामुळे अतिक्रमण होईल असा तो नसावा. तो स्वच्छ असावा, घाणेरडा, विकृत, छुपा नसावा. आजकालच्या व्यक्तिगत जीवनाचा शिमगा करणाऱ्या साहित्याचे मोजमाप वाटर्यांच्या या तराजूने करून पाहावे. ह्यामुळेच The slag of liberty torn, but flying म्हणणाऱ्या वायरनच्या जीवनाची महती आणि त्याचे ग्रीसच्या राष्ट्रीय जीवनातील स्थान त्यांना त्याच्या वाहेरख्याली जीवनामुळे ओढून खाली आणावेसे वाटत नाही. जगावेगळ्या माणसांनाही त्यांनी जगात आणून वसविले आहे. खरं म्हणजे कित्येक समस्यांची आपणापुरती पूर्ती करून घेण्यात त्यांनी जीवनातले समाधान मिळवले आहे. 'अनादरो भवती' म्हणण्याइतका संयम निःसंकोच अजून त्यांनी सांभाळला आहे. क्वचित 'शिक्यांच्या आठवणी' येतात अत्यंत हृद्य तरी संयत. 'भारतात धर्मयुद्धे का झाली नाहीत ?' हा त्यांचा सवाल आहे. त्याचं उत्तर त्यांनीच दिलं आहे— 'आम्ही हमेशा उदार होतो. कारण आमचे औदार्य आमच्या इच्छाशक्तीतून आणि विवेकातून प्रकट झाले नाही. आमच्या वेजवाबदार आळसातून वाहेर पडले. ह्याच आणि तत्सम विचारातूनच त्यांनी महाराष्ट्राच्या मनाचं चित्रण केलं आहे. 'वाहेरचा' हा लेख 'दिवस असे होते' ह्याच्या परिशिष्टात जाऊन वसावा. असेच आणखी काही लेख आहेत. अर्थात् प्रकट 'मनोगत' म्हणजे आत्मनिवेदनच नव्हे काय ? ह्या मनोगतातील आणखी एक उत्कृष्ट लेख म्हणजे— नवरदेव की मशालजी--मांडणीच्या दृष्टीने नव्हे पण विचाराच्या दृष्टीने.

एवढे सुस्पष्ट आणि सुश्लिष्ट. विचार असलेल्या पुस्तकातील विविध मथळ्यांच्या शिरोभागी संभ्रमित विसंवादी वाक्यांची योजना कशासाठी करण्यात आली असावी ? आहेत म्हणून उगाच 'टैपांचा' खर्च केला असावा काय ?

—मा. नी. ग.

वाहिलेली फुले

लेखक : जगन्नाथ रामचंद्र जोशी, प्रकाशक : सौ. इंदिरा बनहट्टी
दीप प्रकाशन, छोटी धनतोली, नागपूर १. पृष्ठे डेमी आकाराची ३२८. किंमत १० रुपये.

'वाहिलेली फुले' हा श्री. ज. रा. जोशी यांचा पाचवा प्रकाशित ग्रंथ. या ग्रंथापूर्वी श्री. जोशी यांनी लिहिलेले डॉ. खरे यांचे द्विखंडात्मक चरित्र, तसेच डॉ. केदार आणि न्या. मू. काकासाहेव पुराणिक यांची चरित्रे यांचे प्रकाशन केले असून न्या. डॉ. भवानीशंकर नियोगी यांचे श्री. जोशीलिखित चरित्रही प्रकाशनाच्या मार्गावर आहे ! सावार व विस्तृत माहिती आणि मनोवेधक लेखनशैली यांना चरित्रविषयासंबंधीच्या डोळस श्रद्धेची जोड मिळाल्यामुळे श्री. जोशी यांचे सर्व चरित्रग्रंथ रसाळ आणि वाचनीय झालेले असून त्यानिमित्ताने विदर्भाच्या गेल्या अर्धशतकाच्या राजकीय व सामाजिक जीवनाचे मोठे उद्बोधक दर्शन वाचकांना घडते. 'वाहिलेली फुले' या आपल्या नवप्रकाशित ग्रंथाला त्यांनी स्वतःच्या चरित्रग्रंथांवर आलेल्या अभिप्रायांचे जे उतारे जोडलेले आहेत त्यावरून त्यांचे सर्वच लेखन किती लोकमान्य झाले आहेत, याचा प्रत्यय येतो. या अभिप्रायलेखकात कै. स्वातंत्र्यवीर सावरकरांपासून तो श्री. धनंजय कीर यांच्यासारख्या ख्यातनाम चरित्रलेखकांपर्यंत विविध व्यक्तींचा समावेश असल्याचे दिसून येते आणि श्री. जोशीवुवांच्या चरित्रलेखनविषयक कामगिरीच्या श्रेष्ठत्वाचा त्यावरून प्रत्यय येतो.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मात्र, 'वाहिलेली फुले' या त्यांच्या नव्या ग्रंथाचे स्वरूप अन्य ग्रंथांहून वेगळे आहे. चरित्रलेखना-व्यतिरिक्त श्री. जोशीबुवांनी जे स्फुटलेखन वेळोवेळी केले आहे त्या लेखनाचे संकलन या ग्रंथातून आढळते. प्रस्तुत ग्रंथ व्यक्तिचित्रे, डॉ. खरे यांचे विविध दर्शन, इतर लेख व कविता, पत्रे व भाषणे व माननीयांचे उद्‌गार अशा पाच भागात विभागलेला असून व्यक्तिचित्रे व डॉ. खरे यांचे विविध दर्शन हे त्यातले सर्वात महत्त्वाचे भाग वाटतात. चरित्र-लेखनापेक्षा व्यक्तिचित्रे रेखाटण्याला कमी कौशल्य लागते असे नाही. उलट, चरित्रलेखनासाठी उपलब्ध माहिती विस्ताराने मांडण्याला जो अवसर असतो तो व्यक्तिचित्र रेखाटताना असत नाही. त्यामुळे संबंधित व्यक्तीचे मोजक्या शब्दात प्रामाणिक चित्र रंगविणे ही अत्यंत अवघड अशी कसरत व्यक्तिचित्र रेखाटणा-ऱ्याला करावी लागते. श्री. जोशीबुवा हे या कसरतीत यशस्वीपणे उत्तीर्ण झाले आहेत व म्हणूनच त्यांच्या सराईत लेखणीतून उतरलेली नरकेसरी बॅ. अभ्यंकर, कै. दादासाहेब खोगले, प्रा. म. श्री. पंडित; डॉ. मुंजे, डॉ. नियोगी, डॉ. य. खु. देशपांडे, विद्वद्रत्न डॉ. भाऊजी दप्तरी इत्यादींची व्यक्तिचित्रे जिवंत वाटतात. मोजक्या शब्दातून रेखीव चित्रण करण्याचे श्री. जोशी-बुवांचे कौशल्य पाहायचे असेल तर डॉ. दप्तरींच्या बाह्य रूपरेषांचे त्यांनी केलेले चित्रण पाहावे ! डॉ. दप्तरींच्या चेहऱ्याचे वर्णन करताना ते लिहितात-- " डोळे मिटून भाऊजींचा चेहरा जर नजरेपुढे आणला, तर त्यावर वाढलेले केस म्हणजे अकाली पाऊस यावा व त्यानंतर खुरटलेले विरळ गवत जमिनीत वाढावे आणि ते लवकरच सुकून जाऊन त्याच्यावर बारीक बारीक हिरवट, मुरकट काड्या उभ्या राहाव्या, तसे भाऊजींच्या चेहऱ्यावर पांढरे करडे मिश्रित केस वाढलेले नेहमीच दिसून येत. त्यांची ती डोक्यावरील काळी टोपी. तिची उंच दिवालही सरळ होती म्हणता का ! छट, तिलाही मुरड वा घडी पडलेली !..." डॉ. भाऊजींना पाहिलेल्या कोणत्याही व्यक्तीला हे चित्रण प्रत्ययकारी वाटल्यावाचून कसे राहील ? प्रा. म. श्री. पंडितांच्या व्यक्तिचित्रणातही जोशीबुवांचे हेच कौशल्य दिसून येते ! व्यक्तिचित्रण करणाऱ्याला आवश्यक अशी सूक्ष्म निरीक्षणशक्ती जोशीबुवांजवळ आहे तसेच योग्य शब्दांतून ते निरीक्षण उभे करण्याचे लेखनकौशल्यही त्यांना साधले आहे. यामुळेच त्यांची सारी व्यक्तिचित्रे वास्तव आणि कलात्मक वाटतात. जणू या साऱ्या व्यक्तींना आपण पुन्हा एकदा प्रत्यक्ष बघत आहोत, असे वाटू लागते.

डॉ. खरे यांचे विविध दर्शन या विभागातील दहा लेखांतून श्री. जोशींनी डॉ. खरे यांच्या कार्याचे खरे मूल्यमापन करण्याचा प्रयत्न केलेला असून अकरा-व्या लेखात डॉ. खरे यांच्या अर्धांगीचे-सौ. इंदिराबाई खरे यांचे-चित्र रेखाटले आहे. डॉ. खरे यांच्या विस्तृत चरित्र लेखनानंतरही त्यांच्या कामगिरीविषयी विपर्यस्त असे जे काही लिखाण १९५० नंतर प्रकाशित झाले त्याचा परामर्ष जोशीबुवांनी या विभागात घेतलेला दिसतो ! आपल्या चरित्रनायकाचे मूल्य कमी झालेले जोशी-बुवांना मुळीही खपत नाही ! शिवाय, चरित्रकार या नात्याने चरित्रग्रंथात केलेल्या प्रत्येक विधानाची पाठराखणी करण्याचे दायित्व पार पाडण्याचे काम त्यांना करणे भागच होते ! श्री. जोशी यांची सत्यप्रीती व त्यांचा झुंजार स्वभाव यांचे दिग्दर्शन या विभागातून घडते. मात्र या विभागात 'बहादूर नेपाळ व भेकड भारत' या लेखाचा अंतर्भाव करण्याचे प्रयोजन कळत नाही. कारण डॉ. खऱ्यांच्या व्यक्तित्वावर प्रकाश टाकणारा एकही उल्लेख या लेखात नाही ! कदाचित, चिनी आक्रमणाच्या संबंधात नेपाळने प्रगट केलेली बहादुरी डॉ. खऱ्यांच्या झुंजार वृत्तीशी जुळणारी वाटल्याने लेखकाने असे केले असावे !

इतर लेख व कविता या विभागातून जोशीबुवांनी ललित लेखनालाही स्पर्श करून पाहिल्याचे दिसते. 'भागवत ध्वज उभारिला' ही एकनाथांच्या साधु-वृत्तीवर प्रकाश टाकणारी नाटिका आणि 'हृदयहारिकेस' सारखी सफाईदार कविता चरित्रकार जोशी लिहू शकतात, हे 'दर्शन' जोशीबुवांशी परिचित असलेल्या व्यक्तीला विलक्षण 'धक्का' देणारे आहे! — हा धक्का अर्थातच 'सुखदायक' धक्का आहे, हे मान्य केले पाहिजे ! ललितलेखनाला आवश्यक अशी 'बीजे' जोशीबुवांच्या ठिकाणी होती...ती बीजेच राहिली हे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बरे झाले ! अन्यथा, ललितलेखनाच्या मागे लागून जोशीबुवांनी चरित्रलेखनाच्या 'गंभीर' प्रकाराकडे पाठ फिरविली असती तर या लेखन प्रकाराचे केवढे नुकसान झाले असते, याची कल्पनाच केलेली बरी !

जोशीबुवांची सारी हयात पत्रकार म्हणून गेली ! —'महाराष्ट्रा'तून वेळोवेळी केलेले प्रासंगिक स्वरूपाचे लेखनही या ग्रंथात समाविष्ट केलेले आढळते. तसेच त्यांनी प्रसंगोपात्त केलेली भाषणेही संक्षिप्त स्वरूपात 'पत्रे व भाषणे' या विभागात आढळतात. विचार व लेखन या दृष्टीने या ग्रंथातील हा भाग विशेष मौलिक स्वरूपाचा आहे, असे नाही. तथापि, सत्याचा पाठपुरावा करण्याची जोशीबुवांची जिद्द आणि त्यांच्या विचारसरणीची दिशा या विभागातील लेखनाने कळून येते. माननीयांच्या उद्गारातून जोशीबुवांना आलेली विविध पत्रे संग्रहित करण्यात आलेली आहेत व त्यांच्या पत्रलेखकांत साहित्यसम्राट केळकर, वि. स. खांडेकर, जगद्गुरु श्रीशंकराचार्य यासारख्या मान्यवरांचा समावेश आहे.

चरित्रग्रंथावर विभिन्न वृत्तपत्रातून आलेल्या अभिप्रायांवरूनही जोशीबुवांनी संपूर्ण महाराष्ट्रात चरित्रलेखक म्हणून किती मान्यता मिळविली आहे हे ध्यानात येते. मात्र हा विभाग अधिक आटोपशीर करता आला असता तर बरे झाले असते असे वाटल्यावाचून राहात नाही.

राजमान्यता आणि समाजमान्यता प्राप्त केलेल्या जोशीबुवांचा हा ग्रंथ त्यांच्या अन्य ग्रंथांप्रमाणेच वाचनीय आहे, यात शंका नाही ! त्यांचे, डॉ. नियोगी यांचे प्रकाशित चरित्र लवकर प्रकाशित व्हावे तसेच त्यांनी संकल्पिलेल्या एकनाथ चरित्राचे व देऊळगावराजा येथील जाधवांच्या इतिहासाचे लेखन त्यांच्याकडून पूर्ण व्हावे अशी त्यांच्या अनेक चाहत्यांची अपेक्षा आहे--मीही ती अपेक्षा येथे व्यक्त करून 'वाहिलेली फुले' या ग्रंथाबद्दल जोशीबुवांचे तसेच त्याच्या सुबक मुद्रण-प्रकाशनाबद्दल श्री पां. ना. बनहट्टी व सौ. इंदिरा बनहट्टी यांचे अभिनंदन करतो.

—वसंत वऱ्हाडपांडे

नाटक झाले जन्माचे :

लेखक : ल. ना भावे; प्रकाशक : ग. बा. नेवाळकर
संचालक, प्रकाशनविभाग भारतीय ग्रंथभवन, दादर, मुंबई १४; पृष्ठ ३१२ : मूल्य ८ रुपये

श्री. ल. ना. भावे ह्यांची ही पहिलीच स्वतंत्र सामाजिक कादंबरी मराठी रंगभूमीच्या पार्श्वभूमीवर आधारलेली असून शैलजा चंद्रचूड ह्या नाटचवेड्या तरुणीच्या जीवनाची शोकांतिका ह्या कादंबरीतून चित्रित केली आहे.

शैलजा चंद्रचूड ही एका सरळमार्गी विधुराची एकुलती एक कन्या. कॉलेजमध्ये असतानाच एक उत्कृष्ट अभिनेत्री म्हणून ती लौकिक मिळवते. तिच्या एका भूमिकेच्या निमित्ताने 'नाटचसंजीवन' या प्रसिद्ध संस्थेच्या मालकाशी तिचा परिचय होतो. दिलीप हा एक उत्कृष्ट नट व दिग्दर्शक असतो. त्याच्याविषयी तिला आकर्षण वाटते आणि त्याच्या स्वैर-वर्तनाविषयीचे लोकापवाद दृष्टिआड करून 'आपल्या प्रीतिबलाने त्याला सन्मार्गाला वळवीन' या प्रतिज्ञेने ती दिलीपशी वडिलांच्या इच्छे विरुद्ध विवाह करते.

पण, दिलीप हा आपल्या प्रेमापेक्षा स्वतःच्या व्यवसायाला अधिक महत्त्व देतो...व्यावसायिक यशापुढे त्याला पत्नीच्या चारित्र्याचीही पर्वा वाटत नाही. आपल्या वडिलांना दुःख होऊ नये म्हणून शैलजा त्यांना आपल्या जीवनातील दुःख सांगत नाही. पतिपत्नीतील प्रेम पूर्णतः ओसरून त्यांच्यातील संबंध धनी व नोकर असे रूप घेतात; पण बाह्यात्कारी दिलीप आपल्या पत्नीवर प्रेम असल्याचा अभिनय करीत जगाला फसवीत असतो ! दिलीपच्या या वर्तनाची घृणा येऊन शैलजा त्या जीवनाचा त्याग करण्याच्या

(पुढील मजकूर पान १३५)

अनुक्रमणिका
मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

फॉरसाइथने, १८२४ मध्ये एका आंग्ल अधिकाऱ्याच्या उपस्थितीत घडलेल्या आणि त्याने निमार रेकॉर्डमध्ये नमूद केलेल्या भयंकर आत्मघाताचे हृदयद्रावक यथोचित वर्णन केले आहे; ते त्याच्याच शब्दात देत आहे—

नर्मदेतील मांधाता बेट त्यावेळी ब्रिटिशांच्या सरहद्दीत नव्हते. त्यामुळे तो भयंकर आत्मघात थांबविण्यासाठी कोणताच उपाय करता आला नाही.

लेखकाने त्या दुर्दैवी प्राण्याला आत्मघातापासून परावृत्त करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. परंतु दुर्दैवाने त्याला त्यात यश मिळाले नाही.

त्यावेळी मी तेथे उपस्थित होतो. भैरवाची प्रतिकृती म्हणून शेंदराने माखलेला एक खडक आहे. त्या मूर्तीच्यावर असलेल्या खडकावर चढण्यापूर्वी त्या माणसाने मूर्तीला दंडवत घातला. तो तिथे येण्यापूर्वी कर्णकर्कश आवाजात वाद्ये वाजत होती. तो त्या अजस्र मूर्तीवर हलकेच चढला. त्याच्या चेहऱ्यावर एक आगळाच आनंद दिसत होता. मी त्याच्या नावाने ओरडून त्याला त्या कृत्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न चालविला आणि त्याला पूर्ण संरक्षण द्यावयाचे आश्वासन दिले. त्याकरिता नाव काठावर आणून ठेवण्याची दक्षता घेतली होती. त्या नावेतून आम्ही पाच मिनिटात दुसऱ्या किनाऱ्यावर पोहोचलो असतो. त्याक्षणी तो म्हणाला 'शक्तिशाली भैरवापुढे मानवी शक्तीचा पाडाव लागणार नाही.'

"त्याला त्या कृत्यापासून परावृत्त करणे फक्त जबरदस्तीनेच काय ते शक्य झाले असते. परंतु तेही साध्य होऊ शकले नाही (—कारण तो भाग ब्रिटिशांच्या सरहद्दीत नव्हता). त्याने, माझ्या बोलण्याकडे मुळीच लक्ष न देता आपले कार्य चालूच ठेवले. त्या मूर्तीसमोर आल्यावर त्याच्या अंगात जणू शक्ती संचरली. त्याच्या सभोवती जमलेले लोक ओरडून आणि हातवारे करून त्याला प्रोत्साहित करीत होते. तोही आपल्या हालचालींनी माझ्या सांगण्याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे दाखवीत होता. त्याने नंतर नारळांची मागणी केली. एक फोडून त्यातील पाणी त्याने कमंडलूतील पैसे आणि कवड्या काढून त्यात टाकले. त्याला कमंडलू दिलेल्या पुजारिणीने पहिल्यांदा आपल्या मुलाला तीर्थासारखे काही तरी हातातून पिण्याकरिता दिले आणि नंतर त्या माणसाला दिले. ते थोडेसे द्रव त्यांनी मूर्तीवरही ओतले. नंतर त्या पुजारिणीने त्याच्या बोटातील चांदीच्या आंगठ्या मागितल्या. त्यापैकी एक तोंडात ठेवली आणि इतर परत दिल्या. नंतर त्या ठिकाणी उपस्थित असलेल्या जमावातील त्या माणसाला पाहिजे असलेल्या माणसाकडे त्याने अंगुलीनिर्देश करून त्याला ती तोंडातील अंगठी देण्यात यावी असे खुणविले. तो मनुष्य तर उज्जैनपासूनच त्याच्या सांगाती होता! आता त्याच्या पवित्र स्पर्शाने आपल्या बांगड्या, सुपाऱ्या वगैरे वस्तू पवित्र करून घेण्याची सर्व जमावाला उत्सुकता वाटू लागली. त्या वस्तू तो तोंडात ठेऊन परतही करू लागला. पुजारिणीने शेवटी त्याला एक विडा दिला. त्यावेळी तो मोठ्या निश्चयाने पावले टाकीत जाऊ लागला. जमलेली गर्दी ओरडा करीत त्याची वाहवा करू लागली. तो चढत असताना झुडुपांमुळे दिसत नव्हता. परंतु थोड्याच वेळात तो त्या खडकावर चढून गेला. आता तर तो अतिशय धैर्याने त्या खड-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कावर उभा होता, जणू काही तो परमेश्वराला आवाहन करीत होता. त्याचे हात वर गेले. त्यावेळी त्याने खाली जमलेल्या जमावाला नमस्कार केला. हे झाल्यावर आपल्या हातातील नारळ, आरसा, पहार आणि चुना ह्या वस्तू त्याने खाली सोडून दिल्या. नंतर थोडावेळ तो मागे सरकला. आणि नंतर वरून, त्या भयंकर उंचीवरून टेकडीखाली वेगाने धावत सुटला. मध्येच एका आडव्या सुळक्यावरून त्याचा देह घरंगळत–कोलांटी उडी खाऊन–नव्वद फुटावरून खाली कोसळून फुटून त्यांची जीवनज्योत पंचत्वात विलीन झाली.

"नव्वद फुटावरून स्वतःला खाली झोकून देणाऱ्या या तरुणाच्या स्वतःच्या शक्तीवरील विश्वासाचा, धैर्याचा एखाद्या चांगल्या कारणासाठी उपयोग होऊ शकला असता."

इंग्रजी वरून अनुवादित उतारा—

गोंडवन कथा—
आयर चॅटरटन
बिशप ऑफ नागपूर.

(पान १३३ वरून)

विचारात असताच तिच्या वडिलांच्या मृत्यूची तार दिलीप तिला देतो व शैलजा दुःखाने खाली कोसळते !

कादंबरीचे कथानक लेखकाने निवेदन केल्याप्रमाणे साधे व सरळ आहे व शैलीही केवळ निवेदन करणारी आहे. मराठी रंगभूमीच्या पार्श्वभूमीवर ही कादंबरी आधारली असली व त्या निमित्ताने लेखकाने नाटकाच्या तालमींचे वगैरे यथार्थ चित्रण करण्याचा प्रयत्न केला असला तरी कादंबरीतील चित्रित जीवन प्रातिनिधिक स्वरूपाचे वाटत नाही. त्याचप्रमाणे, केवळ आपल्या नाट्यप्रयोगावर प्रतिकूल टीका होऊ नये म्हणून रमाकांतासारख्या नाट्यसमीक्षकाची शैलजेसंबंधीची वासना पूर्ण करण्याची तयारी दिलीपने दाखवावी व तिने तसे केले नाही म्हणून आकांडतांडव करावे हे वर्णनही अतिरेकी वाटते !—अर्थात्, दिलीप हा स्वैराचारी आहे व शैलजेवरील त्याचे प्रेम हेही, तिच्याशी लग्न केल्याने अभिनयनिपुण व रूपसुंदर अशा अभिनेत्रीचा लाभ आपल्या व्यवसायाला उपकारक ठरेल याच व्यावसायिक भूमिकेतून निर्माण झाल्याचे लेखकाने दिलीपचे व्यक्तिचित्र रेखाटताना सुचविले आहे व त्याच्या त्या भूमिकेशी त्याचे ते वर्तन सुसंगतही आहे, यात शंका नाही ! तथापि, मराठी रंगभूमीवरील हे प्रातिनिधिक चित्रण नव्हे, हे मात्र नमूद करावेसे वाटते.

लेखकाने कोणाच्याही शैलीचे अनुकरण केलेले नाही असे म्हटले आहे. तथापि, प्रा. ना. सी. फडक्यांच्या शैलीचा केवढा ठसा लेखकावर उमटला आहे, हे निवेदन व संवादलेखन या दोन्हीतून दिसून येते. प्रा. फडक्यांच्या 'अखेरचं बंड' या मराठी रंगभूमीच्या पार्श्वभूमीवरील कादंबरीशी प्रस्तुत कादंबरीची तुलना करण्याचा मोह होतो व तुलनेनंतर प्रा. फडक्यांची कादंबरी कितीतरी सरस आहे, हे मान्य करावे लागते ! दारुण स्वप्नभंगामुळे शैलजाच्या मनात निर्माण झालेले वादळ मनोविश्लेषणाचा आधार घेऊन अधिक समर्थपणे लेखकाला वर्णन करता आले असते. परंतु, तसे इथे घडले नाही. त्यामुळेच शैलजाचे व्यक्तिचित्र प्रभावी वाटत नाही. तिच्याविषयी सहानुभूती वाटते, हे खरे; पण तिची तीव्रता उत्कट वाटत नाही.—अण्णा, दिलीप ही प्रमुख व्यक्तिचित्रेही अशीच उतरली आहेत. ती पडली आहेत असे नव्हे. पण खोल परिणाम करणारी मात्र नाहीत; इतकेच !

तथापि, रूढ चाकोरीपेक्षा वेगळी पार्श्वभूमी आणि परिणामकारक निवेदन यांनी ही कादंबरी वाचनीय वाटते, हे नमूद करणे अवश्य आहे.

—वसंत वऱ्हाडपांडे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघवार्ता

बाबुराव चिमोटे
सरचिटणीस, वि. सा. संघ, यांजकडून

आजीव सभासद

श्री. शा. गो. ऊर्फ बाळासाहेब गवालपंची, नगराध्यक्ष, चंद्रपूर हे संस्थेचे आजीव सभासद झाल्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहो.

परीक्षा समिति वृत्त——

केंद्राधिकाऱ्यांना सूचना आणि विनंती

आपणास कळविण्यात येते की, सप्टेंबर सत्राची परीक्षा शनिवार दिनांक २४ आणि रविवार दिनांक २५ सप्टेंबर १९६६ ला घेण्यात येईल.

नवीन अभ्यासपत्रक आपणाकडे पाठविण्यात आले आहे. अपेक्षित आवेदनपत्रांची मागणी शक्य तितक्या लवकर करावी.

(नवीन केंद्र सुरू करण्यासाठी कमीतकमी २५ विद्यार्थी परीक्षेस बसविले तरच केंद्र–मान्यता देण्यात येईल असा समितीचा परिपाठ आहे.)

परीक्षार्थी–आवेदन–पत्र–मूल्य २५ पैसे प्रमाणे केंद्रातच अवांतर खर्चासाठी राखून ठेवावे. आवेदन–पत्र–मूल्य आणि केंद्र–पुरस्कार यांचा सामान्यतः विनियोग टपालखर्च, प्रमाण–पत्र–वितरण व पारितोषिक वितरण यासाठी करावा. केवळ परीक्षार्थ्यांचे निर्धारित शुल्कच केंद्रीय कार्यालयाकडे पाठवावे.

आपल्या केंद्रातून दिनांक २५ ऑगस्टपर्यंत परीक्षार्थी–आवेदनपत्रे सशुल्क भरून घेऊन केंद्रीय कार्यालयाकडे ३० ऑगस्टपर्यंत पाठविण्याची दखल घ्यावी.

या सत्रात जास्तीत जास्त विद्यार्थी परीक्षेस बसवून सहकार्य द्यावे ही विनंती.

दि. १ ऑगस्ट ६६ }
नागपूर }

ग. स. देशपांडे
संचालक परीक्षा समिती, वि. सा. संघ.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

इ. स. १९६५-६६ चे कार्यवृत्त

एक एप्रिल १९६५ पासून सुरू झालेल्या नवीन वर्षात कार्यकारी मंडळाच्या चार आणि सर्वसाधारण सभासदांची एक सभा झाली.

यावर्षी, संस्थेचे एकूण ९७० सदस्य पटावर नोंदले गेले. त्यात २३९ आजीव, ४ उपकर्ते, ६ आश्रयदाते, २ सहाय्यक, ५ हितचिंतक आणि ७३१ सर्वसाधारण सभासद होते.

वेगवेगळ्या समित्यांनी संबंधित वर्षातील कार्यक्रम व्यवस्थित पार पडल्याबद्दल त्या त्या समित्यांचे आमंत्रक आणि कार्यकर्ते यांना मन:पूर्वक धन्यवाद.

सांस्कृतिक कार्यक्रम समितीद्वारे—श्रीगणेश व्याख्यानमाला, कै. ना. के. बेहेरे व्याख्यानमाला-कवी कालिदास स्मृतिदिन, लो. टिळक पुण्यतिथी, कवी 'बी' पुण्यतिथी, कै. अ. व. कोल्हटकर स्मृतिदिन, संस्थेचा ४३ वा वर्धापनदिन, स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती, सौ. प्रभावती राजे यांची व्याख्यानमाला, इत्यादी कार्यक्रम झाले.

श्रीगणेश व्याख्यानमालेचे ६ वे पुष्प प्रा. डॉ. अ. ना. देशपांडे यांनी दि. २४ ते २६ एप्रिल ६६ पर्यंत गुंफले असून 'श्रीसंत ज्ञानेश्वर आणि आजची जागतिक समस्या' ह्या विषयावर त्यांचे व्याख्यान झाले.

कै. ना. के. बेहेरे व्याख्यानमालेत पद्मश्री प्रा. अनंत काणेकर यांनी दि. १९, २० आणि २१ जानेवारी ६६ रोजी ललितवाङ्मयाचा आद्य हेतू, ललितवाङ्मयातील नवे-जुने आणि ललितवाङ्मयाचा आनंद' या विषयांवर व्याख्याने दिली.

दि. १९, २० आणि २१ ऑगस्ट ६५ रोजी राजकुमारी सौ. प्रभावतीबाई राजे यांची 'भगवद्गीता तात्पर्य—कर्मनिष्ठा ज्ञाननिष्ठा आणि उपसंहार' या विषयावर व्याख्याने झाली.

या व्यतिरिक्त भिन्नभिन्न कार्यक्रमांत ॲ. ड. न. व. चांदूरकर, आचार्य दादासाहेब धर्माधिकारी श्री. त्र्यं. खं. गंधे आदी नामवंत वक्ते, साहित्यिकांची व्याख्याने झाली.

दि. ८ मार्च ६६ रोजी 'श्रीतुकाराम बीज' निमित्त ह. भ. प. दादाबुवा देवरस यांचे, कीर्तन झाले.

नाट्य समिती तर्फे—कै. श्री. कृ. कोल्हटकर, वीर वामनराव जोशी, नाट्याचार्य खाडिलकर यांचे स्मृतिदिन साजरे करण्यात आले.

दि. १४ ऑगस्ट ६५ रोजी श्री. वसंत पोतदार यांनी 'वंदे मातरम' हा एकपात्री प्रयोग सादर केला.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

खोलकुटे ढाल नाटय स्पर्धेत ३ महाविद्यालयांनी भाग घेतला. या वर्षी, 'खोलकुटे ढाल' शासकीय विज्ञान महाविद्यालय यांनी सादर केलेल्या श्री. शं. गो. साठे लिखित 'ससा आणि कासव' या नाटयप्रयोगाला मिळाली.

या वर्षीपासून ही स्पर्धा नागपूर येथे धनवटे रंगमंदिरात घेण्याचा पायंडा पाडण्यात आला.

'**बालनाटयोत्सवा**'त सी. पी. अँड बेरार हायस्कूलने 'नवा चष्मा' (ले. पु. व्यं. दारव्हेकर), महाराष्ट्र विद्यालयाने 'बंडाचा झेंडा' आणि नॉन गॅझेटेड पोस्टल ऑडिट असोसिएशनने 'गाणारी मैना' (ले. श्री. रत्नाकर मतकरी) ह्या तीन नाटिका सादर केल्या. ह्या सर्व नाटिका दि. ६-२-६६ आणि दि. १३-२-६६ रोजी दुपारी १ वाजता धनवटे रंगमंदिरात सादर करण्यात आल्या. 'नवा चष्मा' ही नाटिका सादर करणाऱ्या संस्थेला प्रथम क्रमांकाचे रु. ५० आणि रंजनकला मंदिरातर्फे फिरता रौप्य चषक, 'गाणारी मैना'च्या चमूला दुसऱ्या क्रमांकाचे रु. ३०, आणि 'बंडाचा झेंडा' सादर करणाऱ्या चमूला तृतीय क्रमांकाचे रु. २०, याप्रमाणे पारितोषिके देण्यात आली.

नाटय समितीच्या वतीने यावर्षी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रस्तुत कार्यक्रम म्हणजे विदर्भातील सुप्रसिद्ध एकांकिका लेखक कै. पद्माकर डावरे यांच्या स्मृतिदिनाप्रित्यर्थ 'एकांकिका स्पर्धा' दि. २ ते ४ फेब्रुवारी ६६ पर्यंत आयोजित करण्यात आल्या. या स्पर्धेत एकूण ८ संस्थांनी भाग घेतला. स्पर्धेत, रंजनकला मंदिराने सादर केलेल्या 'कागदाच्या भिंती' या एकांकिकेला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक रु. ५० आणि फिरती 'कै. पद्माकर डावरे रौप्य ढाल' मिळाली. धनवटे नॅशनल कॉलेजने सादर केलेल्या 'सदू आणि दादू' या एकांकिकेला द्वितीय क्रमांकाचे रु. ३० चे पारितोषिक मिळाले.

दि. १३ फेब्रुवारी ६६ रोजी सायंकाळी ६-३० वाजता श्री. स. ना. लिमये, कंट्रोलर ऑफ फिल्म डिव्हिजन (मुंबई) यांचे शुभहस्ते सर्व स्पर्धांच्या विजेत्या चमूला आणि व्यक्तिगत प्रथम क्रमांक मिळविणाऱ्यांना, पारितोषिके देण्यात आली.

दि. १ मे ६६ रोजी नाटककार आणि 'रंगमंदिरा'चे निर्माते कै. नाना जोग स्मृतिदिना-निमित्त तीन एकांकिका सादर करण्यात आल्या.

दि. ११ मे ६५ रोजी श्री. पु. व्यं. दारव्हेकर लिखित 'वऱ्हाडी मानसं' नाटकाचा प्रयोग, दि. १२ मे रोजी नाटककार श्री. विजय तेंडुलकर यांचे 'नवी नाटके-नवी रंगभूमी' या विषयावर व्याख्यान, दि. १३ मे रोजी नाटयसमितीच्या वतीनेच 'साहित्यिक मैफल'—त्यात नाटयविषयक चर्चा—झाली. दि. १९ व २० सप्टेंबर रोजी सदानंद जोशी (मुंबई) यांचे 'मी अत्रे बोलतोय्' चा एकपात्री प्रयोग, दि. ११ डिसेंबर रोजी सौ. सुनीताबाई देशपांडे यांचा 'राजमाता जिजाबाई'चा प्रयोग, दि. ९ नोव्हेंबर रोजी सौ. सुहासिनी मुळगावकर यांचा 'संगीत स्वयंवर' नाटकाचा एकपात्री प्रयोग इत्यादी कार्यक्रम झाले.

दि. १५ आणि १६ डिसेंबर रोजी सुप्रसिद्ध नाटककार आणि साहित्यिक श्री. पु. ल. देशपांडे यांनी 'अभिनय साधना' या विषयावर दोन व्याख्याने दिली.

न्या. म. रानडे आंतरमहाविद्यालयीन वादस्पर्धेत विदर्भातील एकूण २४ महाविद्यालयांनी भाग घेतला. प्रस्तुत वादस्पर्धा दि. २२ ते २४ सप्टेंबर ६५ रोजी घेण्यात आली.

यावर्षी अमरावतीच्या विदर्भ महाविद्यालयाला फिरती रौप्य ढाल मिळाली.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

स्पर्धेचा विषय—' केंद्र सरकारने जाहीर केलेल्या त्रिभाषा सूत्रानेच देशाच्या सांप्रतच्या भाषिक समस्येची सोडवणूक होईल.'

कु. प्रतिमा तेलंग, विदर्भ महाविद्यालय अमरावती यांना १०० रुपयांचे वैयक्तिक प्रथम-क्रमांकाचे पारितोषिक आणि प्रमाणपत्र देण्यात आले. श्री. व्ही. बी. देशपांडे, गव्ह. पॉलिटेक्निक नागपूर यांना रु. ७५ चे दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक आणि प्रमाणपत्र देण्यात आले. पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम दि. २४ सप्टेंबर रोजी श्री. पी. एस्. मुळगावकर, डेप्यु. डायरेक्टर ऑफ एज्यु-केशन, नागपूर यांचे हस्ते झाला.

श्री. वि. स. खांडेकर सत्कार समिती (पुणे) यांचे वतीने वि. सा. संघाच्या स्वाधीन केलेल्या निधीच्या रकमेवरील व्याजातून महाराष्ट्रातील विद्यापीठांतून बी. ए. परीक्षेत मराठी ऐच्छिक विषयात प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्याला प्रत्येकी रु. ७५ ची रोख पारितोषिके देण्यात येतात. इ. स. १९६५–६६ मध्ये पुढीलप्रमाणे पारितोषिके देण्यात आली.

कु. सरोजबाला जगदीश वर्मा (यवतमाळ), नागपूर विद्यापीठ.
कु. पुष्पा किसनराव माथेकरव (वाडगली–परभणी), मराठवाडा विद्यापीठ.
श्रीमती लीला श्रीधर एकबोटे (अहमदनगर), पुणे विद्यापीठ
कु. शशिकला रघुनाथ साठे (मुंबई), मुंबई विद्यापीठ.
श्रीमती आशा भालचंद्र सवनीस (सावंतवाडी), श्रीशिवाजी विद्यापीठ

गडकरी स्मारक समितीने सालाबादप्रमाणे नाटककार कै. राम गणेश गडकरी यांचा ४७ वा स्मृतिदिन साजरा केला. प्रथम. दि. २३ जानेवारी ६६ रोजी सकाळी १० वा. सावनेर मुक्कामी जाऊन कै. गडकरी यांचे समाधीजवळ श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यावेळी कार्यक्रमाचे नियोजित वक्ते प्रा. भालचंद्र फडके (अमरावती) यांचे सुश्राव्य भाषण झाले.

सायंकाळी ७ वा. वि. सा. संघात स्मृतिदिन साजरा झाला. यावेळी प्रा. भालचंद्र फडके यांचे 'गडकरी यांचे नाट्य-संवाद लेखन' या विषयावर विचारपरिप्लुत भाषण झाले.

रंगमंदिर समिती—

रंगमंदिराच्या परिसरात प्रकाशाची व्यवस्था करण्याकरिता श्री. गोपालदासजी चांडक, मेसर्स चांडक इलेक्ट्रिक वर्क्स (नागपूर) यांनी रु. २००/- चा मर्क्युरी दिवा दिला.

अत्रे थिएटर्स प्रा. लि. यांनी रंगमंदिराच्या दर्शनी–मखमली पडद्यासाठी रु.३०००/- ची देणगी दिली.

दि. ४ डिसेंबर ६५ रोजी सायं. ६–३० वा. आचार्य प्र. के. अत्रे यांच्या शुभहस्ते, अत्रे थिएटर्स प्रा. लि. तर्फे रंगमंदिराला दिलेल्या दर्शनी मखमली पडद्याचे उद्घाटन झाले. यावेळी आचार्य अत्रे यांना संस्थेतर्फे चांदीचे तबक व रेशमी गळपट्टा देण्यात आला.

या उद्घाटनप्रसंगी आचार्य अत्रे यांचे भाषण झाले.

परीक्षा समिती तर्फे यावर्षी अ–मराठी भाषिकांसाठी मराठी प्रवेश, परिचय, बोध आणि प्रबोध ह्या चार परीक्षा सुरू करण्यात आल्या. पहिल्याच वर्षी या परीक्षांना चांगली चालना मिळाली.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सप्टेंबर आणि जानेवारी ह्या दोन्ही सत्रात एकूण २८९९ विद्यार्थी परीक्षेस बसले.
सप्टेंबर सत्र—एकूण विद्यार्थी १११९ केंद्रे—४०
जानेवारी सत्र—एकूण विद्यार्थी १७८० केंद्रे—५१

यावर्षी साहित्याचार्य प्रबंध परीक्षेकरिता दोन विद्यार्थ्यांनी नावे नोंदली. इ. स. ६५–६६ साली कु. अलकनंदा मुनशी यांना, 'वामन मल्हार जोशी यांच्या कादंबऱ्यांतील स्त्री जीवनाचे दर्शन' या विषयावरील प्रबंधाला, साहित्याचार्य पदवी देण्यात आली.

संस्थेतर्फे पुढील मनोरंजन कार्यक्रम सादर करण्यात आले.

दि. १८ सप्टेंबर ६५—डॉ. कुमार गंधर्व यांचे गायन. दि. ९ ऑक्टोबर ६५—डॉ. वसंतराव देशपांडे यांचे गायन सोबत पद्मश्री उस्ताद अहमदजान थिरकवा यांचे तबला वादन. दि. २० नोव्हेंबर ६५—पं. भीमसेन जोशी यांचे गायन. दि. ६ ७ आणि ८ डिसेंबर ६५—बहुरुपी (कलकत्ता) या संस्थेतर्फे दशचक्र, कांचनरंग आणि पुतुलखेला ही तीन बंगाली नाटके. दि. १३, १४ डिसेंबर ६५— श्री. पु. ल. देशपांडे यांचे 'असामी असामी' चे दोन एकपात्री प्रयोग. दि. २२, २३ जानेवारी ६६—लिटल थिएटर मुंबई तर्फे श्री. पु. व्यं. दारव्हेकर आणि सौ. सुधा करमरकर लिखित 'चिनी बदाम' आणि श्री. दिनकर देशपांडे लिखित 'हुं हूं आणि हुं हुं हुं' या नाटकांचे प्रयोग.

यावर्षी शैक्षणिक व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात येऊन मॅट्रिक, प्री–युनिव्हर्सिटी आणि बी. ए. (आर्टस्) च्या विद्यार्थ्यांकरिता मराठी विषयाच्या पुस्तकांवर भाषणे झाली. या शैक्षणिक व्याख्यानमाला सत्रात श्री. दि. व. पंडित, श्री. मा. नी. गलगलीकर, प्रा. भा. श्री. परांजपे, श्री. वसंतराव वरखेडकर प्रा. व. कृ. वऱ्हाडपांडे आणि प्रा. रू. पां. पाजणकर यांनी सहकार्य दिले. संस्था वरील व्याख्यात्यांची ऋणी आहे.

'युगवाणी' संपादक मंडळातर्फे या वर्षी आठ अंक काढण्यात आले.

या मासिकाच्या वतीने 'साहित्य गोष्टी' कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येऊन त्यात कविता वाचन, कथावाचन आणि साहित्य विषयक चर्चा करण्यात आली. या कार्यक्रमाच्या एकूण ११ बैठकी झाल्या.

श्री. मा. नी. गलगलीकर, श्रीकान्त राय, श्री. प्रभाकर सिरास, श्री. कृष्णा चौधरी आणि श्री. प्रभाकर पुराणिक यांनी 'साहित्य गोष्टी' चे उत्कृष्ट आयोजन केले.

सत्कार, भेटी, निरोप समारंभ, स्मृतिदिन आणि कार्यक्रम—

नभोवाणी संचालक श्री. प्रतापकिशन यांना निरोप (दि. २५–४–६५)

टाईम्स ऑफ इंडियाचे प्रतिनिधी श्री. पी. डी. ऊर्फ बाळासाहेब अभ्यंकर यांना निरोप (दि. २८–१२–६५)

सांस्कृतिक खात्याचे मंत्री श्री. रा. मा. हजरनवीस यांची भेट (दि. ६ ऑक्टोबर ६५)

सुप्रसिद्ध कवी श्री. वि. द. घाटे आणि श्री. श्री. वा. रानडे यांची भेट (दि. १७–११–६५)

संयुक्त सोशालिस्ट पार्टीचे अध्यक्ष श्री. एस्. एम्. जोशी यांची भेट (दि. २७–११–६५)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत. १९२३
विदर्भ साहित्य संघ

सुप्रसिद्ध कवी श्री. ग. दि. माडगूळकर आणि विनोदी लेखक श्री. रमेश मंत्री यांची भेट (दि. ३–१२–६५)

शिक्षण मंत्री श्री. मधुकरराव चौधरी यांची भेट (दि. ६–१२–६५)

बंगाली नट श्री. संभू मित्रा आणि सौ. त्रिप्ती मित्रा यांची भेट (दि. ९–१२–६५)

माननीय श्री. रा. मा. हजरनवीस यांचे समवेत दिल्ली येथील प्रसिद्ध टीकाकार श्रीमती मीना मराठे यांची भेट (दि. २०–१२–६५)

व्हीनस बुकस्टॉलचे चालक श्री. अ. ह. लिमये यांची भेट (दि. २१ डिसेंबर ६५)

परराष्ट्र खात्याचे उपमंत्री माननीय श्री. दिनेशसिंह यांची दि. २६–१२–६५ रोजी भेट. यावेळी 'भारत पाक संघर्ष आणि त्याचा आंतरराष्ट्रीय परिणाम' याविषयावर व्याख्यान.

सांसदीय व्यवहार आणि दळणवळण उपमंत्री श्री. विद्याचरण शुक्ल यांची भेट (१३-१-६६)

सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. म. ना. अदवंत यांची भेट (दि. १३–२–६६)

प्रा. श्री. भा. वर्णेकर यांनी डॉक्टरेट पदवी करिता सादर केलेल्या प्रबंधाला नागपूर विद्यापीठाने मान्यता दिल्याबद्दल दि. ६–१२–६५ रोजी सायं. ६–३० वा. त्यांचा सत्कार झाला. यावेळी म. म. डॉ. वा. वि. मिराशी, प्रा. डॉ. ग. त्र्यं. देशपांडे, म. म. बाळशास्त्री हरदास यांची गौरवपर भाषणे झाली. याप्रसंगी प्रा. वर्णेकर यांना श्रीफल आणि शाल अर्पण करण्यात आली.

सुप्रसिद्ध गायिका सौ. हिराबाई बडोदेकर यांचा, एकसष्टी निमित्त आणि भारत शासनाच्या संगीत नाटक अकदमीचे पारितोषिक मिळाल्याबद्दल दि. ९. डिसेंबर ६५ रोजी सत्कार करण्यात आला. यावेळी श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, अॅड. श्री. मधुकरराव मंगरूळकर, श्री. शंकरराव नेरकर यांची भाषणे झाली. याप्रसंगी सौ. हिराबाईंना रुप्याचा करंडा भेट देण्यात आला.

वरोडचाच्या आनंदवनाचे निर्माते श्री. बाबासाहेब आमटे यांच्या 'ज्वाला आणि फुले', 'वर्कर्स युनिव्हर्सिटी' या पुस्तकांवर दि. ११ डिसेंबर १९६५ रोजी 'हितगुज' करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. पु. ल. देशपांडे होते. यावेळी श्री. पु. व्यं. दारव्हेकर, श्री. दि. ब. पंडित, श्री. रमेश गुप्ता, प्रा. वा. कृ. चोरघडे यांची भाषणे झाली.

तैलचित्राचे अनावरण––

लोकनायक डॉ. मा. श्री. उपाख्य बापूजी अणे, विश्वस्त, वि. सा. संघ यांच्या तैलचित्राचे अनावरण दि. २७–१२–६५ रोजी रेल्वेमंत्री श्री. स. का. पाटील यांचे हस्ते झाले. यावेळी श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, खासदार श्री. देवराव पाटील, म. म. बाळशास्त्री हरदास यांची भाषणे झाली. या समारंभाचे वेळी लो. ना. बापूजी अणे उपस्थित होते.

तैलचित्र, वि. सा. संघाचे पूर्वाध्यक्ष डॉ. मा. गो. देशमुख यांनी संस्थेला भेट दिले.

स्मृतिदिन आणि जयंती––

शिवजयंतीनिमित्त दि. ३ मे ६५ रोजी प्रा. शांताराम विद्वांस विरचित शिवस्मृतीतील काही गीते, सुप्रसिद्ध गायक डॉ. बाळासाहेब पुरोहित यांनी गाऊन दाखविली.

रियासतकार डॉ. गो. स. सरदेसाई यांची जन्मशताब्दी, वि. सा. संघ, नागपूर विद्यापीठ आणि विदर्भ संशोधन मंडळ या संस्थांतर्फे गडकरी सभागृहात दि. १७–५–६५ रोजी साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. य. खु. देशपांडे यांनी भूषविले होते.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पं. जवाहरलाल नेहरू यांच्या स्मृतिदिनानिमित्त 'महाराष्ट्र' दैनिकाचे संपादक श्री. दि. ब. पंडित यांचे दि. २७ मे ६५ रोजी भाषण झाले. यावेळी श्री. विजय मो. देशपांडे यांनी लिहिलेला 'नेहरूंच्या शब्दात नेहरूदर्शन' हा कार्यक्रम झाला.

कै. साने गुरुजी पुण्यतिथीनिमित्त वि. सा. संघ आणि साधना ट्रस्ट पुणे या संस्थांच्या वतीने दि. ११ जून ६५ रोजी प्रा. वा. कृ. चोरघडे यांच्या अध्यक्षतेखाली, कार्यक्रम झाला. यावेळी प्रथितयश साहित्यिक सौ. मालतीबाई बेडेकर यांचे व्याख्यान झाले. याप्रसंगी 'साधना' कुमार अंकाचे प्रकाशन करण्यात आले.

कविवर्य अण्णाजी बोबडे यांचा ३१ वा स्मृतिदिन दि. १ आक्टोबर ६५ रोजी साजरा झाला. यावेळी प्रा. म. श्री. पंडित यांचे कै. अण्णाजी बोबडे यांच्या कवितेवर भाषण झाले.

सुप्रसिद्ध कथालेखक आणि टीकाकार कै. कुसुमावतीबाई देशपांडे यांचा स्मृतिदिन दि. १७–११–६५ रोजी साजरा करण्यात आला.

नागपुरातील दिवंगत कवी श्री. गोविंद गोपाळ उर्फ मामा रामभजनी यांचा ६ वा स्मृतिदिन, दि. १९–१२–६५ रोजी सायं. ६-३० वा. संघाध्यक्ष प्रा. वा. कृ. चोरघडे यांचे अध्यक्षतेखाली साजरा झाला. यावेळी प्रा. गणपतराव सुंभ, श्री. नाना रेटर, श्री. दि. ब. पंडित, ॲड. श्री. मधुकरराव मंगरूळकर आणि प्रा. वा. कृ. चोरघडे यांची भाषणे झाली. या कार्यक्रमात सुप्रसिद्ध गायिका सौ. पद्माताई गोळे (शाळिग्राम) यांनी कै. मामा रामभजनी यांच्या काही कविता गाऊन दाखविल्या.

सुप्रसिद्ध कथालेखक कै. गो. रा. दोडके यांचा स्मृतिदिन दि. ३१–१–६६ रोजी 'महाराष्ट्र' दैनिकाचे संपादक श्री. दि. ब. पंडित यांचे अध्यक्षतेखाली साजरा झाला. या प्रसंगी प्रा. म. श्री. पंडित, श्री. मा. नी. गलगलीकर, श्री. ना. रा. शेंडे, श्री. मनोहरपंत परांजपे यांची भाषणे झाली.

कवी केशवसुत जन्मशताब्दीनिमित्त दि. १५ मार्च ६६ रोजी सायं. ६-३० वा. केशवसुतांच्या काव्यवैशिष्ट्यांवर कवी अनिल यांचे अध्यक्षतेखाली प्रा. म. श्री. पंडित, डॉ. मा. गो. देशमुख, प्रा. म. शं. वाबगावकर आणि प्रा. द. भि. कुळकर्णी यांची भाषणे झाली.

कै. स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांना दि. २१ मार्च ६६ रोजी श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी श्री. दि. ब. पंडित, आचार्य दादासाहेब धर्माधिकारी यांची भाषणे झाली.

शाखावृत्त

काटोल—

शाखेतर्फे दि. ९–९–६५ रोजी संघाध्यक्ष प्रा. वा. कृ. चोरघडे यांचा सत्कार करण्यात आला.

वि. सा. संघाचे २६ वे साहित्य संमेलन घेण्यासंबंधी शाखेने निर्णय घेतला असून सप्टेंबर ६६ मध्ये संमेलन व्हावयाचे आहे.

अमेरिकेहून परत आलेले एक सभासद डॉ. द. मा. मुनशी यांच्या सुयशाबद्दल अभिनंदन करण्यात आले.

प्राचार्य ना. ए. घासकडबी हे बुलढाणा येथे बदलून गेल्याबद्दल त्यांना निरोप देण्यात आला.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अमरावती--

शाखा कार्यकारिणीचा उद्घाटन समारंभ दि. ४-१०-६५ रोजी श्री. जवाहरलालजी मुनोत यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. या कार्यक्रमास आमदार श्री. अकर्जे उपस्थित होते.

प्रा. मनोहर कवीश्वर यांचा 'गीतगोविंद' व 'समरगीत' म्हणून दाखविण्याचा कार्यक्रम दि. ३०-९-६५ रोजी, नशाबंदी विभागाचे संघटक श्री. वामनराव गावंडे यांचे अध्यक्षतेखाली झाला.

दि. १५ जानेवारी ६६ रोजी, कार्यकारिणीच्या सभेत, कै. लालबहादुरशास्त्री आणि कै. न. वि. उपाध्य काकासाहेब गाडगीळ यांच्या निधनाबद्दल, श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

दि. १२-३-६६ रोजी प्राचार्य सौ. भानुमती सिंह यांचे अध्यक्षतेखाली कवी संमेलन झाले.

अकोट--

शाखतर्फे, श्री. दि. का. मायी यांची आर्वी येथे पोलीस प्रॉसिक्यूटर म्हणून बदली झाल्याबद्दल निरोप देण्यात आला.

श्री. श्री. पु. पिंपळापुरे यांना महाराष्ट्र-राज्य समाजशिक्षण समितीतर्फे सहकार विकास या विषयावरील 'लाख दिलाचे-एक मनाचे' या पुस्तकाला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाल्याबद्दल शाखेतर्फे अभिनंदन करण्यात आले.

दि. २९-१-६६ रोजी शाखेच्या वतीने तेल्हारा येथे मराठी-हिंदी-उर्दूभाषी कवी-संमेलन झाले.

बुलढाणा--

शाखेतर्फे दि. ११ आणि १२ सप्टेंबर ६५ रोजी आचार्य अत्रे लिखित 'मी उभा आहे' या नाटकाचा प्रयोग सादर करण्यात आला. दि. १२ रोजी झालेल्या प्रयोगाचे उत्पन्न मंरक्षण निधीला देण्यात आले.

वणी--

शाखेतर्फे दि. १८ नोव्हेंबर ६५ रोजी श्रीज्ञानेश्वर पुण्यतिथीनिमित्त प्राचार्य राम शेवाळकर यांचे 'ताटी उघडा ज्ञानेश्वरा' या विषयावर व्याख्यान झाले.

दि. १२ डिसेंबर ६५ रोजी कवी श्री. राजा बढे यांचा काव्यगायनाचा कार्यक्रम झाला.

दि. २० डिसेंबर ६५ रोजी शाखा आणि लो. टिळक महाविद्यालय यांच्या वतीने पद्मश्री श्री. पु. ल. देशपांडे यांचा 'हसविण्याचा माझा धंदा' हा कार्यक्रम झाला.

दि. ५, ६ आणि ७ फेब्रुवारी ६६ रोजी बहिःशाल व्याख्यानमाला झाली.

दि. ५ फेब्रुवारी ६६ वक्ते--प्राचार्य अरविंद जोशी, विषय- अध्यात्मिक अधिष्ठानाची आवश्यकता.

दि. ६ फेब्रुवारी (सकाळी) प्राचार्य अरविंद जोशी यांचे 'भारतीय-स्त्री' या विषयावर व्याख्यान.

दि. ६ आणि ७ फेब्रुवारी ६६ प्रा. भालचंद्र फडके यांचे 'मराठी-रंगभूमी' या विषयावर भाषण.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

दि. १० फेब्रुवारी ६६ दासनवमीनिमित्त श्री. मनोहरराव नावलेकर वकील, यांचे 'श्रीसमर्थांचे कार्य' या विषयावर भाषण.

दि. ८ मार्च ६६ रोजी 'श्रीतुकाराम बीज'निमित्त श्री. माधवराव सरपटवार यांचे 'तुका झालासे कळस' या विषयावर भाषण.

दि. १३ मार्च ६६ रोजी 'नाथषष्ठी'निमित्त प्रा. शांताराम कवडे यांचे 'लोकसाहित्यकार एकनाथ' या विषयावर भाषण.

मूर्तिजापूर--

दि. २१-११-६५ रोजी श्रीज्ञानेश्वर पुण्यतिथीचे दिवशी शाखा उद्घाटनाचा कार्यक्रम ला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. मधुकर आष्टीकर आले होते यावेळी कवी संमेलनाचा कार्यक्रम झाला.

दि. १७-३-६६ च्या कार्यकारिणीसभेत डॉ. वि. भि. कोलते यांची कुलगुरूपदी निवड झाल्याबद्दल, अभिनंदनाचा ठराव करण्यात आला.

खामगाव--

दि. २९ जून रोजी क. श्री. कृ. कोल्हटकर जयंती साजरी झाली. यावेळी विदर्भातील कवी श्री. ना. घ. देशपांडे यांच्या काव्यसंग्रहाला महाराष्ट्र शासनाने दिलेल्या पुरस्काराबद्दल त्यांना श्रीफल आणि शाल अर्पण करण्यात आली. यावेळी कै. कोल्हटकरांवर श्री. ना. घ. देशपांडे यांचे भाषण झाले.

यावर्षी नाटयशाखेने सौ. इंदिरा देव कृत 'सौभाग्य' आणि प्रा. मो. दा. देशमुख कृत 'देव्हारा' ही दोन नाटके सादर केली.

कोल्हटकर व्याख्यानमालेत वि. सा. संघाचे अध्यक्ष प्रा. वा. कृ. चोरघडे, प्राचार्य फाटक, प्रा. जहागीरदार, श्री. जनुभाऊ अणेकर वकील, श्री. नानासाहेब पांडे, डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांची व्याख्याने झाली.

यावर्षी कोल्हटकर स्मारकाच्या रंगमंचावर टिनाचे आवरण घालण्यात आले.

या व्यतिरिक्त चंद्रपूर, वरुड, वर्धा या गावी शाखाकार्य सुरू आहे.

संलग्नसंस्था--

भारतीय भाषाध्ययन मंदिर नागपूर, रंजनकला मंदिर नागपूर, विदर्भ संशोधन मंडळ नागपूर, आणि नागपूर नाटय मंडळ ह्या संस्था वि. सा. संघाच्या संलग्न संस्था आहेत.

वि. सा. संघाला अनुदान--

विदर्भ साहित्य संघाला महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडून खालीलप्रमाणे अनुदान प्राप्त झाले.

(अ) वार्षिक अनुदान-- रु. ७५००-००

(आ) नाटयसमिती करिता-- रु. २०००-००

बंगाली नाटकांच्या आयोजनाकरिता झालेल्या खर्चाच्या तोंडमिळवणीसाठी भारत सरकारच्या मिनिस्ट्री ऑफ एज्युकेशन या खात्याकडून रु. २६११-५४ मिळाले.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

या व्यतिरिक्त संस्थेला पुढील व्यक्तींकडून देणग्या मिळाल्या—

श्री. अनंतराव [illegible] पुणे, यांचेकडून कै. अ. ब. कोल्हटकर पुण्यतिथीनिमित्त रु. १० ची देणगी.

ॲड्व्होकेट श्री. भाऊसाहेब बोवडे नागपूर यांचेकडून कवी कै. अण्णाजी बोवडे यांच्या स्मृतिदिनानिमित्त रु ५० ची देणगी.

सिटी क्लब नागपूर यांचेकडून कै. अण्णाजी बोवडे स्मृति–दिनानिमित्त रु. ५० ची देणगी.

श्री. प्रभाकर सीताराम देव, नागपूर, यांचेकडून रु. १८५ ची देणगी.

विदर्भ साहित्य संघ शासनाचा आणि इतर देणगीदारांचा अत्यंत आभारी आहे.

आभार—

या वर्षी वि. सा. संघाचे कार्य पार पाडण्यास अनेक कार्यकर्त्यांचे, सभासदांचे आणि संस्थांचे सहाय्य झाले. वि. सा. संघ त्यांचा अत्यंत ऋणी आहे

आपले,

वा. कृ. चोरघडे अध्यक्ष	म. ल. देशमुख तु. बा. कारेकर	बापुराव चिमोटे सरचिटणीस
शं. बा. शास्त्री उपाध्यक्ष	भाऊ बांडवकर चिटणीस	सौ. सरलाबाई धावे कोषाध्यक्ष.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ, नागपूर १९६५–६६

३१ मार्च १९६६ ला संपणाऱ्या जमा–खर्चाचा तक्ता

जमा

तपशील	रु. पै.	रु. पै.
वर्गणी—		
साधारण सभासद वर्गणी	२,३९१ ००	
संलग्न संस्था	२० ००	
आजीव सभासद वर्गणी	८०२ ००	३,२१३ ००
इतर किरकोळ उत्पन्न—		
व्याज	३६५ ४८	
पुस्तक विक्री	६९१ ४९	
किरकोळ उत्पन्न	८०६ ०१	
निलंबित खाते	२० ००	
कार्यक्रमाचे उत्पन्न	२२,६४१ २१	२४,५२४ १९
शैक्षणिक, सांस्कृतिक कार्यकलाप उत्पन्न		
परीक्षा शुल्क	४,१८४ ६२	
सांस्कृतिक कार्यक्रम समिती	९०३ २९	
युगवाणी वर्गणी	४४४ ००	
कै. रानडे वाद स्पर्धा	१९९ ८८	
कै. पद्माकर डावरे एकांकिका नाटय स्पर्धा	१७८ १७	५,९०९ ९६

खर्च

तपशील	रु. पै.	रु. पै.
कार्यालयीन खर्च—		
वेतन खर्च	५,८७९ ८२	
भविष्य निधीचा वि. सा. संघ हिस्सा	१०२ ८५	
दूरध्वनि डाकव्यय, वीजखर्च, मुद्रण व लेखनसामुग्री, वाहनव्यय इत्यादी—	४,९८९ १३	१०,९७१ ८०
अंकेक्षण शुल्क		१०० ००
शैक्षणिक कार्यकलाप—		
युगवाणी मुद्रण	५,४१८ ३८	
नाटय समिति व नाटयस्पर्धा	१४,४८३ २६	
गडकरी स्मारक समिती	७७ २५	
लोकसाहित्य संपदा प्रकाशन	३३७ ५०	
मराठी साहित्य महामंडळ	६४९ ५४	२०,९६५ ९३
रंगमंदिर खर्च—		
वेतन खर्च	७,७७० ००	
इतर कार्यालयीन खर्च	१७,०९० ६९	
विजेची सामग्री	५,४७८ ९१	
तात्पुरते कर्ज फेड	२,७५९ ५०	३३,०९९ १०

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

देणग्या		१,१७५ ००
सरकारी संधारण अनुदान		७,५०० ००
भविष्य निधी		३२८ ९७
कै. श्री. पद्माकर डावरे एकांकिका नाट्य स्पर्धा		
खामगाव शाखेकडून	५०१ ००	
रंजनकला मंदिर	१०१ ००	
वि. सा. संघ हिस्सा	१७८ १७	
		७८० १७
श्रीशिवाजी ग्रंथालय उत्पन्न—		
देणग्या, भाडे इत्यादी	५,००० ००	
वि. सा. संघाकडून तात्पुरते कर्ज	२,००० ००	
सुरक्षा स्थितनिक्षेप (ठेकेदार)	११८ ०९	
		७,११८ ०९
रंगमंदिर उत्पन्न—		
भाडे	३४,८७९ ००	
सायकल स्टँड उत्पन्न	२,०५० ६९	
देणग्या	५,७५९ ५०	
		४२,६८९ १९
आरंभीची शिल्लक—		
विदर्भ साहित्य संघ	१०,२८९ ८४	
रंगमंदिर	२,५१५ ७७	
श्रीशिवाजी ग्रंथालय	१,३२० ७४	
		१४,१२६ ३५
एकूण		१,०७,३६४ ९२

श्री. शिवाजी ग्रंथालय खर्च—		
कार्यालयीन व्यवस्था इत्यादी	८१२ ६९	
विद्युत् स्थितनिक्षेप	७५ ००	
तात्पुरते कर्ज फेड	३,००० ००	
बांधकाम	३,३८८ ८६	
		७,२७६ ५५
पुस्तक खरेदी		६ ७२
लो. ना. बापूजी अणे तैलचित्र		१७१ ५६
कै. श्री. नाना जोग स्मारक (दिव्याची व्यवस्था)		२१३ ००
वस्तु खरेदी		३२ ५०
श्री शिवाजी ग्रंथालयास तात्पुरते कर्ज (वि. सा. संघाकडून)		२,००० ००
भविष्य निधी		३२८ ९७
शिल्लक—विदर्भ साहित्य संघ करंट	१८,९३० ६५	
रंगमंदिर	१२,१०५ ८६	
श्री शिवाजी ग्रंथालय	१,१६२ २८	
		३२,१९८ ७९
एकूण		१,०७,३६४ ९२

तपासले ते बरोबर आहेत.

वा. कृ. चोरघडे
अध्यक्ष

बाबुराव चिमोटे
सरचिटणीस

२०-७-१९६६

महेश्वर जनार्दन गद्रे
चार्टर्ड अकौंटंटस्

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

(१–४–१९६५ ते ३१ मार्च १९६६) ३१ मार्च १९६६ ला संपणाऱ्या वर्षाचा आय–व्यय तक्ता

तपशील (व्यय)	रु.	पै.	रु.	पै.
कार्यालयीन खर्चः—				
वेतन खर्च	५,८७९	८२		
भविष्य निधीचा वि. सा. संघ हिस्सा	१०२	८५		
इतर कार्यालयीन खर्च	४,९८९	१३		
			१०,९७१	८०
अंकेक्षण शुल्क			१००	००
वि. सा. संघाच्या ध्येयावर झालेला खर्च				
शैक्षणिक— युगवाणी मुद्रण	५,४१८	३८		
नाट्यसमिती व नाट्य स्पर्धा	१४,४८३	२६		
गडकरी स्मारक समिती	७७	२५		
मराठी साहित्य महामंडळ	६४९	५४		
			२०,६२८	४३
पुढे चालू			३१,७००–२३	

तपशील (आय)	रु.	पै.	रु.	पै.
साधारण सभासद वर्गणी	२,३९१			
संलग्न संस्था	२०	००		
			२,४११	
इतर किरकोळ उत्पन्नः—				
ठेवीवरील व्याज	३६५	४८		
पुस्तक विक्री	६९१	४९		
किरकोळ उत्पन्न	८०६	०१		
कार्यक्रमाचे उत्पन्न	२२,६४१	२१		
			२४,५०४	१९
शैक्षणिक कार्यकलाप उत्पन्नः—				
परीक्षा शुल्क	४,१८४	६२		
सांस्कृतिक कार्यक्रम समिती	९०३	२९		
युगवाणी वर्गणी	४४४	००		
कै. रानडे वाद स्पर्धा	१९९	८८		
कै. श्री. पद्माकर डावरे एकांकिका नाट्य स्पर्धा	१७८	१७		
			५,९०९	९६
पुढे चालू			३२८२५	१५

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तपशील	व्यय		तपशील	आय	
(मागील पानावरून)	३१७००–२३		(मागील पानावरून)	३२८२५–१५	
श्रीशिवाजी ग्रंथालय:—			सरकारी सं[redacted] अनुदान	७,५००	००
कार्यालयीन खर्च वगैरे	८१२	६९	देणग्या	१,१७५	००
खर्चापेक्षा उत्पन्न जास्त	८,९८७	२३			
एकूण	४१,५००	१५	एकूण	४१,५००	१५

तपासले ते बरोबर आहेत.

बा. कृ. चोरघडे
अध्यक्ष

बाबुराव चिमोटे
सरचिणीटस

२०–७–१९६६

महेश्वर जनार्दन गद्रे
चार्टर्ड अकौंटंटस्

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

३१ मार्च १९६६ चे स्थिति विवरण (बॅलन्स शीट)

फंड व लायबिलिटिज

तपशील		रु.	पैसे	रु.	पैसे
सामान्य निधी	मागील	४३,७२६	९६		
	यंदाचे	८,९८७	२३		
				५२,७१४	१९
रंगमंदिर निधी (देणग्या, भाडे इत्यादी)	मागील	२,५४,६७६	९२		
	यंदाचे	१७,८२८	५०		
				२,७२,५०५	४२
श्रीशिवाजी ग्रंथालय निधी (देणग्या, भाडे इत्यादी)	मागील	३६,९९७	४७		
	यंदाचे	५,०००	००		
				४१,९९७	४७
इतर निधी व ठेवी (सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे-पृ. क्र. १६)	मागील			२५,९१४	८०
आजीव सभासद	मागील	११,६४८	००		
	यंदाचे	८०२	००		
				१२,४५०	००

असेट्स व प्रॉपर्टीज

तपशील		रु.	पैसे	रु.	पैसे
कायम मत्ता (असेट्स)					
रंगमंदिर	मागील			५,५६,२६३	०३
श्रीशिवाजी ग्रंथालय	मागील	८७,४१४	१३		
	यंदाचे	३,३८८	८६		
				९०८०२	९९
टिनशेड व विहीर	मागील			५,३४१	८६
उपस्कर व इतर सामान	मागील	१३,५३५	२६		
	यंदाचे	५,५११	४१		
				१९,०४६	६७
पुस्तके (गडकरी ग्रंथालय)	मागील	२,०४५	१२		
	यंदाचे	६	७२		
				२,०५१	८४
ग्रंथ प्रकाशन (लोकसाहित्यसंपदा)	मागील	१७	५०		
	यंदाचे	३३७	५०		
				३५५	००
कै. गडकरी तैलचित्र	मागील			३००	००
लो. ना. बापूजी अणे तैलचित्र	मागील	१५०	५०		
	यंदाचे	१७१	५६		
				३२२	०६

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सरकारी अनुदान:-				
रंगमंदिर	२,४१,९७३	००		
श्रीशिवाजी ग्रंथालय	३२,०००	००		
ग्रंथप्रकाशन (मराठी वर्णोच्चार विकास)	५०१	६५		
			२,७४,४७४	६५
श्रीशिवाजी ग्रंथालय तात्पुरते कर्ज मागील			१०,०००	००
इतर देणी:- सुरक्षा स्थितनिक्षेप (ठेकेदार)	२,३९८	८९		
व्यापारी देणे (रंगमंदिर)	४७,९९९	६७		
निलंबित खाते	६०	६३		
			५०,४५९	१९
एकूण			७,४०,५१५	७२

कै. श्री. नाना जोग स्मारक मागील			३,१३९	४३
मुदती ठेव:-				
बारा वर्षे नॅशनल प्लॅन सेव्हि. सर्टिफिकेट	२,०००	००		
दहा वर्षे ट्रेझरी सेव्हिंग्ज सर्टिफिकेट	६,०००	००		
स्थितनिक्षेप—विदर्भ प्री. को. ऑ. हा. सोसायटी	११,५०१	००		
स्थितनिक्षेप—हिंदफिन (विश्वस्तांच्या नावे)	२,०००	००		
			२१,५०१	००
भविष्य निधी—विदर्भ प्री. को. ऑ. हाउसिंग सोसायटी			१,६७६	०९
अग्रिमा— (इमारत बांधकाम)	५,३६०	९६		
सुरक्षा स्थितनिक्षेप (विद्युत् व दूरध्वनि)	२,१५६	००		
			७,५१६	९६
शिल्लक:—				
शिल्लक जवळ	४३१	९५		
बँकेत शिल्लक (दि बँक ऑफ महाराष्ट्र आणि विदर्भ प्री. को. ऑ. हा. सोसायटी)	२०,८००	०८		
धनादेश जवळ	१०,९६६	७६	३२,१९८	७९
एकूण			७,४०,५१५	७२

प्रमाणपत्र—विदर्भ साहित्य संघ या संस्थेच्या ३१ मार्च १९६६ रोजी तयार असलेल्या स्थिति विवरणात वर दिलेले आकडे संघाच्या जमा-खर्चाच्या पुस्तकाशी तंतोतंत जुळतात आणि आम्ही ही पुस्तके तपासली असून बरोबर आहेत असे आम्ही प्रमाणपत्र देतो.

वा. कृ. चोरघडे
अध्यक्ष

बाबुराव चिमोटे
सरचिटणीस

२०-७-१९६६

महेश्वर जनार्दन गद्रे
चार्टर्ड अकौंटंटस्

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

३१ मार्च १९६६ पर्यंत इतर निधी आणि ठेवी

क्रमांक	तपशील		रु.	पै	रु.	पै
१	श्री. खांडेकर सत्कार निधी	मागील			८,२०३	९५
२	कै. श्री. वरेरकर सत्कार निधी	मागील			५८५	७१
३	कै. श्री. नेने स्मारक निधि	मागील			७५	००
४	कै. डॉ. शिंगणापूरकर पारितोषिक	मागील			५००	००
५	डॉ. शं. दा. पेंडसे तैल चित्र	मागील			२५	००
६	कै. श्री. बेहेरे व्याख्यानमाला	मागील			६,०००	००
७	श्रीगणेश व्याख्यान माला	मागील			६,०००	००
८	कै. श्री. पद्माकर डावरे एकांकिका					
	नाट्यस्पर्धा यंदाचे:—					
	खामगाव शाखेकडून		५०१	००		
	रंजनकला मंदिर		१०१	००		
	वि. सा. संघ हिस्सा		१७८	१७		
					७८०	१७
९	कै. श्री. नाना जोग स्मारक निधि	मागील			२,०६८	८८
१०	भविष्य निधी	मागील	१,३४७	१२		
		यंदाचे	३२८	९७		
					१,६७६	०९
				एकूण	२५,९१४	८०

महेश्वर जनार्दन गद्रे
चार्टर्ड अकौंटंटस्
२०-७-१९६६

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ



छायाचित्र क्र (१) रंगमंदिराच्या दर्शनी मखमली पडद्याचे उद्घाटनप्रसंगी आचार्य प्र. के. अत्रे भाषण करीत असताना. (२) डॉ. श्री. भा वर्णेकर यांचा सत्कार. (३) डॉ. अ. ना. देशपांडे यांचा सत्कार. (४) माननीय मंत्री श्री. दिनेशसिंग भाषण करीत असताना. (५) गानकोकिळा सौ. हिराबाई बडोदेकर यांचा सत्कार (६) पद्मश्री प्रा. अनंत काणेकर भाषण करीत असताना (७) लो. बापूजी अणे यांच्या तैलचित्राचे अनावरणप्रसंगी रेल्वेमंत्री श्री. स. का. पाटील भाषण करीत आहेत. (८) नाटककार श्री. विजय तेंडुलकर भाषण करीत असताना (९) कुलगुरू डॉ. वि. मि. कोलते सत्कार समारंभ (१०) बंगाली नाटकाच्या उद्घाटनप्रसंगी सांस्कृतिक खात्याचे मंत्री श्री. रा. मा. हजरनवीस भाषण करीत आहेत. (११) राजमाता जिजाबाईच्या भूमिकेत सौ. सुनीताबाई देशपांडे (१२) प्रसिद्ध बंगाली नट श्री. संभू मित्रा व सौ. त्रिप्ती मित्रा (पुतुलखेला नाटक).

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठी भाषा शिकणाऱ्या व्यक्तींसाठी
अत्यंत उपयुक्त पुस्तक—

हिन्दी
मराठी–भाषा–प्रवेशिका

लेखिका :
मालतीबाई श्रीखंडे, एम्. ए., बी. टी.
मूल्य रु. १–२५
वि. सा. संघाचे प्रकाशन––मागणी करा.

विदर्भ साहित्य संघाचे नवे प्रकाशन
लोकसाहित्य संपदा
लेखक व संपादक : ना. रा. शेंडे
विदर्भातील लोकगीतांचे व लोककथांचे संकलन व संपादन.
रसिकांना व अभ्यासकांनाहि सारखाच संग्राह्य.
पृ. ३३६+८ डेमी] [मूल्य ६ रु.

मुद्रक : पां. ना. बनहट्टी, नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर १.
प्रकाशक : मा. नी. गलगलीकर, विदर्भ सहित्य संघ, उत्तर अंबाझरी रस्ता, सीताबर्डी, नागपूर-१.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ